मूल्य रु.१० वार्षिक वर्गणी रु.१२० Visit: http:/www.bsmdadar.com RNI No.1262096 Title Code: MAHMAR45383 Published on 10th February 2015

श्री. वसंत नामे, सौ. शुभदा नामे
पार्ले येथील सुप्रसिद्ध
पार्लेश्वर वडापाव सम्राट

स्वादिष्ट वडापाव
दादर (प)येथे (सुविधाशेजारी)
समारंभासाठी बटाटावडा व समोसाच्या ऑर्डर्स
स्वीकारण्यात येतील.
मराठा भुवन (सुभाष रोड), भोगले चौक (नेहरु रोड), विलेपार्ले
आणि मालाड (पूर्व) येथेही
9324047619, 9819943106

ॐ

॥ उद्धरेदात्मनात्मानम् ॥

ब्राह्मण सेवा मंडळ प्रकाशित

# स्वयम्

ब्राह्मण सेवा

फेब्रुवारी २०१५
वर्ष १ • अंक ३



## ब्राह्मण सेवा मंडळाचे वातानुकूलित सभागृह

## कविश्रेष्ठ ग. दि. माडगुळकर यांनी श्री गणपती अथर्वशीर्षाचे मराठीमध्ये केलेले गीतांतर

तू तो ओंकार साकार, अखिल विश्वाचा आधार। मूल तत्व निराकार, तोही तूची गणेशा ।
तूच या विश्वाचा निर्माता, तूच कर्ता चालविता । तूच अंती लयकर्ता, त्रिगुणांची मूर्त तू । (१)

निर्गुण अथवा सगुण, तयामूळीचे ब्राम्हपण । ते हि साक्षात श्रीगजानन, निस्संदेह बोलतो । (२)

दृश्य जगतीचे चेतन, आत्मरूप कानडे गहन। तेहि प्रत्यक्ष श्रीगजानन, अनंत आणि निरंतन ।
माझे बोलणे व्यावहारिक, जे आधी तेच सत्य तात्विक । त्याचे प्रवचन प्रामाणिक, तुज पुढती मांडीतो ।
अभय असो मज वक्त्यासी, अभय असो गा श्रोत्यांसी। अभय असो गा दात्यांसी, परोपकारी सज्जना ।
जे जे या त्रिजगती, ब्राह्मविद्या संपादिती। त्यांच्या राहोनी मागेपुढे, रक्षी देवा गणेशा ।
वाम अथवा दक्षिणदीशी, अंतराळी वा भूप्रदेशी। जेथून उगम संकटांशी, तेथ उभा ऐस तू ।(३)

वेदशास्त्रादी वाङमय, तोही तुझाची रूपप्रत्यय। शब्दातीत वा अव्यय, तेही तुझीच गुणव्याप्ती।
नावरूपाचा अहंभाव, धरोनी नांदे जडजीव। तयाचाही होई संभव, तुझिया रूपी अनंता।
तू अविनाशी चैतन्यमय, आनंदरूपी आनंदमय। साक्षात ब्रह्म जे अद्वितीय, आदितत्त्व तूचि ते।
तूचि ब्रह्मज्ञान, तूच माया आणि विज्ञान। भौतिकाचेही अधिष्ठान, तुझियारूपी गोंवले ।(४)

सृष्टी तुझियामधुनि उपजे, तुझियामुळेच माया सजे तुझीयाठायीच अंती थिजे, ऐसे वेदांत बोलतो।
तूच पृथ्वी आणि आकाश, वायू वारि वा प्रकाश। अवघ्या भूतांचा आवेश, नवचैतन्य निर्मिते ।(५)

परापश्यंती वैखरी, मध्यमे सहवाणिचारी। त्याही तुझिया निरंकारी, आकारी गणेशा।
जे सत्व, रज, तमांकित, तूं तयांचा न अंकित। तिन्ही वेगळा त्रिगुणातित, सर्व सर्वापार तू।
स्थूल, सूक्ष्म आणि कारण, तया वेगळा देहहीन। भूत, भविष्य, वर्तमान, यांच्या पैलाड ठाकसी।
मानवदेही, मूलाधार, चक्र जे निराकार। तेथ तुझा आविष्कार, नित्य वास्तव्य नांदते।
जनन, रक्षण, संहरण, तिन्हीचे तू अधिष्ठान। योगी करिती तुझेच ध्यान, स्वसंवेध आद्य तू ।
विष्णू करिती जगरक्षण, रुद्र करितो संहरण। तया देवतांचे एकपण, तुझिया अंगी जागते ।
इन्द्रदेवाचा राज्यकर्ता, अग्नियज्ञाचा हव्याभोक्ता। वायू वाहता प्राणदाता, सारी रूपे तुझीच ही ।
प्रकाशदाता श्रीभास्कर, चंद्र औषधीचा ईश्वर। तया उभयतांचे सहस्रकर, तेजोवलये तुझीच ती ।
ब्रह्मलोक वा भूस्थळ, अंतरीक्ष वा स्वर्गलोक। थोर प्रणवाक्षर कि ओंकार, तोही तूची समर्था ।(६)

'ग' वर्णाचा करूनी उच्चार,त्यात मिसळावा'अ' कार स्वर। अर्धेदुवत अनुस्वार, तत्संगती बोलावा ।
मग होईल पूर्ण उच्चार, मूलाधार जे प्रणवाक्षर। सवर्ण नाद जो ओंकार, रूप मांगल्य ते तुझे ।
प्रारंभ रूप तो 'ग'कार, मध्यमरूप तो 'अ'कार। अन्त्यरूप अनुस्वार, बिंदू उतररूप ते ।
या सर्वांचा एकत्रित नाद, स्वरास्वरांचा सुसंवाद। तोचि अनादि ब्रह्मनाद, ओंकार मंगल बोलिजे ।
हाचि तुझा नाममंत्र, हाचि प्रसिद्ध सर्वत्र। हा उच्चारिता अहोरात्र, मुक्ती पायी लोळती ।
या मंत्राच्या सामर्थ्याशी, द्रष्टा झाला गणकऋषि। निवृत्त गायत्री छंदासी, भूषविले मंत्राने ।
ॐ गं गणपतये नमः, हाच मंत्र मंत्रमहिमा। याच्या शक्तीस ना सीमा, अष्टाक्षरी मोक्ष या ।(७)

एकदंताचे महात्म्य, मी यां जाणिले निश्चित। वक्रतुंड झाला ज्ञात, त्यासी ध्यातो आहर्निसी ।
मज साधनाक्रियमाणा, श्री गणेश देवो प्रेरणा। ही गणेश गायत्री जाणा, वाराणसी मंत्राची ।(८)

चतुर्भुज आणि एकदंत, आयुधे शोभति हस्तांत। पाशांकुश, भग्नदंत, वरद मुद्रा शोभते ।
मुषकांकित रक्तध्वज, करि मिरवि जेष्ठराज। रक्तवर्णी महातेज, सर्व देहि फाकते ।
लंबोदर हा शूर्पकर्ण, वस्त्रे त्याला रक्तवर्ण। देहि सर्वांगासी रक्तचंदन, मंगलमूर्ती झळकते ।
रक्तसुमनांच्या मालिका, भक्त वाहती गणनायका। ऐसा विनटतो भक्तसखा, विश्वकर्ता विनायक ।
प्रकृति अथवा पुरुष, यांच्या पैलाड श्रीगणेश। उग्रमूर्ती, उग्रवेश, मंगलकर्ता भक्तांचा ।
मनाचिया लोचनांपुढति, ऐसी निर्मूनिया ध्यानमूर्ती। ध्यान करीत जे पूजिती, तेच योगी या जगी ।(९)

तपश्चर्याचा अधिपति, व्रातगणांचा गणपति। अवघे देव ज्या आदरिती, तो म्या भावे वंदिला ।
एकरदन हा लंबोदर, शिवशक्तींचा प्रियकुमार। भक्तप्रेमी अभयंकर, नमस्कारिला दंती मी ।(१०)

सौजन्य : श्री. राजाराम जोशी



## ।। अथर्वशीर्ष फलश्रुतिः ।।

गणेशभक्तीचा मार्ग आर्ष, देशिमाजी अथर्वशीर्ष,
सर्वोपासनाचा आदर्श, अथर्वशीर्षी पूजिला ।
अथर्वशीर्षाचे अध्ययन, जे जे करील भाग्यवान,
देहीच ब्रह्मत्व येऊन, सायुज्यमुक्ती पावती ।
विघ्नांची न होय बाधा, सुखचि लाभे सर्वदा
स्पर्शू न शकति आपदा, गणपत्या कदापिही ।
हिंसा किंवा अभक्षभक्षण, चौर्य कि परस्त्रीगमन,
ऐसी पापे जाती जळून, गणेशभक्ता पाहता ।
संध्यासमयी दिवसाअंती, जे जे याचा पाठ करिती,
तयांची पापे भस्म होती, दिवसां घडली अजाणता ।
पाठ करितो जे प्रात:काळी, दिनजन्माचे रम्यकाळी
रात्री घडली पापावळी, नाश पावे दंवासवे ।
पठन करिती जे त्रिवार, तया न शिवे पापविचार,
प्राप्त होती पुरुषार्थ चार, धर्म, अर्थ इत्यादिक ।
ज्यांना नसे शिष्यभाव, नास्तिकताची मूळस्वभाव,
गणेशभक्तीची हि ठेव, सांगू नोहे तयाप्रती ।
अनाधिकाऱ्या उपासना, देवो नये कधी कोणा,
दात्या देई हीनपणा, दान ऐसे करो नये ।
अथर्वशीर्षाची आवर्तने, सहस्त्रवेळा शुद्धमने,
जे जे करिती भक्त शहाणे , सर्व इप्सित पावती ।
अथर्वशीर्ष संमंत्रक, करिता गणेश अभिषेक,
हाती येते जन्मसार्थक, वक्ता अजिंक्य होईल तो ।
चतुर्थीच्या मंगलदिवशी, व्रति न राहो उपवासी
जे जे करिती मंत्र जपासी, विद्यासंपन्न होती ते ।
शंका न धरावी येविशी, प्रत्यक्ष बोलला अथर्वऋषि,
सिद्ध सांगे अनुभवाशी, याचा प्रत्यय आगळा ।
अथर्वशीर्षा जे जे जपती, ब्रह्म माया साग्रजाणिती,
निर्भयत्व ते पूर्ण पावती, शरण आणिती भवभूता ।
अथर्वशीर्षाचे मंत्रे करून, जे दूर्वादले करिती हवन,
ते ते होती धनसंपन्न, कुबेर होती पृथ्वीचे ।
साळीच्या फुलवून लाह्या, जे जे हवनास करतील ह्या,
त्यांच्या विघ्नेश धावे साह्या, सर्वगामी होतसे बुद्धी ।
चोहोकडून यशसमृद्धी, श्रावण वर्षे सौख्याचा
सहस्त्र मोदके करिती हवन, त्यांना पावे शिवनंदन ।
अधिकारी अष्ट ब्राह्मणास, करील जो मंत्राचा उपदेश
त्याचे देही फुटे प्रकाश, आदित्य चंद्रासारखा ।
ग्रहण काळी नदीकाठी, जे जे रमती मंत्रपाठी,
सर्व सिद्ध तयासाठी, अहमहमिका लाविती ।
प्रतिमेपाशी बसूनि कोणी, पाठे करिता धन्यवाणी,
दोषमुक्त तो होतो प्राणी, सर्व विघ्ने विनाशती ।
नकळत घडले पापदोष, नष्ट होवूनि निःशेष,
पापी पावतो संतोष, पापविचार नासती ।
किंबहुना पाठकर्ता, स्वयेचि होतो पापहर्ता,
आपाणितो सर्वज्ञता, ऐसे महात्म्य पाठाचे ।
ग्रंथपाठ करता प्रत्यही, अशक्य ऐसे काहीच नाही,
श्रीगणेशही प्राप्त होई, गणेश विद्या धन्य ही ।
गजाननाचा गुणानुवाद, पुरातन हा आर्षनाद,
उमसुतार्थी उपनिषद, येथ संपूर्ण जाहले ।

## "तर सांगायचं म्हणजे.."

नमस्कार मंडळी,

नवीन विचार, उपयुक्त माहिती घेऊन तुमच्या भेटीला येत आहोत. मागील अंकात आवाहन केल्याप्रमाणे, सुजाण वाचकांच्या अनेक सूचना वजा सल्ले आमच्यापर्यंत पोहोचले आहेत. सेवा मंडळाविषयी काही तांत्रिक माहिती म्हणजे संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक, कार्यालयीन वेळा, या अंकापासून प्रसिध्द करीत आहोत. प्रत्येक अंक आपल्या वेबसाईटवरही प्रसिध्द होतोय, याचा आवर्जून उल्लेख करावसा वाटतो. आमच्या विनंतीला मान देऊन काही सभासदांनी त्यांचे बदललेले पत्ते आम्हाला कळवले आहेत. तरीही मागील महिन्यातही बरेच अंक पत्ते न सापडल्याने आमच्याकडे परत आले आहेत. तरी कृपया आपले बदललेले पत्ते मंडळाच्या कार्यालयात कळवावे, ही नम्र विनंती.

जानेवारी २०१५ या महिन्यात झालेल्या संक्रमण महोत्सवात सौ. मृदुला दाढे जोशी यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रयोगशील संगीतकार जयदेव, खय्याम आणि मदनमोहन यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलींचे अतिशय अभ्यासपूर्ण विवेचन केले.

श्रीमती रेणूताई गावस्कर, समाजातील दुर्लक्षित / उपेक्षित वर्गातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी गेली अनेक वर्षे काम करीत आहेत. त्यांचे अनुभवकथन अगदी काळजाचा ठाव घेणारे होते. त्यांच्या या कार्यासाठी चाललेल्या धडपडीला आणि कष्टांना दंडवत!

सौ. रेणूताई दांडेकर आणि त्यांचे पती श्री. राजा दांडेकर यांच्या चिखलगावी स्थापलेल्या लोकमान्य टिळक विद्यामंदिरात, त्यांनी एस.एस.सी बोर्डाचे व्यवसायाभिमुख विषय अभ्यासक्रमात निवडले. त्यायोगे आजुबाजूंच्या खेड्यांमधील घराघरात रोजगाराचे मार्ग उपलब्ध झाले. त्याचबरोबर मुलांना घडवतांना ते चांगला 'माणूस' म्हणून घडावे यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. परंतु, यासाठी अनंत अडचणींना तोंड देत गेली ३०-३२ वर्षे, जी वाटचाल केली त्याला सलाम!

सौ. सोनाली पाटणकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोलिस खात्याच्या, सायबर क्राईम शाखेबरोबर काम करताना आलेले अनुभव कथन केले. ते अगदी मन विषण्ण करणारे होते. पण त्याचवेळी इंटरनेटचा विधायक उपयोग कसा करावा आणि सुरक्षित वापरासाठी काय काय काळजी घ्यावी, याविषयी त्यांनी अतिशय उपयुक्त माहिती दिली.

डॉ. हिरल शहा यांनी, आपल्या खाण्याविषयीच्या सवयी विविध रोगांना कशा आमंत्रण देतात आणि त्यावर कोणतीही औषधे न घेता फक्त दिनक्रमात बदल करून आणि काही पथ्ये पाळून कशी मात करता येईल हे खूप छान समजावून सांगितले.

सालाबाद प्रमाणे माघी चतुर्थीला दुपारी स्त्रियांची व संध्याकाळी पुरूषांची अथर्वशीर्ष आवर्तने झाली.

२६ जानेवारी रोजी सेवा मंडळाच्या इमारतीवर तिरंगा फडकावून प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साहात साजरा झाला.

ग्रंथ तुमच्या दारी ह्या योजनेअंतर्गत दर बुधवारी व शनिवारी सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळात मोफत वाचनालय चालवले जात आहे. सध्या ५० सदस्य आहेत. अधिक सदस्य झाल्यास पुस्तक संख्या वाढू शकेल.

या अंकाच्या मुखपृष्ठावर मंडळाच्या वातानुकूलित सभागृहाची छायाचित्रे आहेत. सभागृहाच्या आरक्षणालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

चला तर मंडळी, स्वयमूच्या माध्यमातून भेटत राहूच.

धन्यवाद.

सौ. कल्पना साठे

### आगामी कार्यक्रम

### सामुदायिक व्रतबंध

**बुधवार दि. ६ मे २०१५ रोजी सकाळी ११ वा. ३ मि. या सुमुहूर्तावर सामुदायिक व्रतबंधाचे आयोजन केले आहे. नावनोंदणी सुरू आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या कार्यालयात संपर्क साधावा.**


कार्यकारी संपादक

- **सौ. कल्पना वसंत साठे**

स्वयम् संपादकीय मंडळ

- **श्री. विनायक कृष्णाजी लेले**
- **श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य**
- **श्री. अभय अनंत सावरकर**
- **सौ. अधिता अर्चिस लेले**
- **सौ. नीला विद्याधर वैशंपायन**
- **श्री. घन:श्याम त्रिंबक जोशी**

संपादन सहाय्य

- **हर्डीकर ॲण्ड असोसिएटस्**

मुखपृष्ठ

- **प्रज्ञा हरणखेडकर**

अंक सजावट व मांडणी

- **एपीज डिझाईन ॲण्ड प्रिन्टस्**



संपादकीय विभाग पत्रव्यवहार

- **स्वयम्, ब्राह्मण सेवा मंडळ,**
  भवानीशंकर रोड, दादर (प),
  मुंबई ४०० २८

दूरध्वनी : २४२२९११८, २४३७१९४९

कार्यालयीन वेळा :
सकाळी ८.३० ते १२.३०
सायंकाळी ४.३० ते ८.३०
रविवार बंद.

ई-मेल : svayambsm@gmail.com
वेबसाईट :www.bsmdadar.com

# ये रे ये रे पैसा...

## पॉकेटमनी

-जयंत विद्वांस

आपण ज्या काळात रहातो, त्या काळातला समाजाचा एक वैचारीक प्रवाह असतो. त्या विचारांच्या विरूध्द जाणे कठिण असते. तसेच मुलांना पॉकेटमनी देण्याचे आहे. आजच्या काळांत पॉकेटमनी हा मुलांचा जन्मसिध्द हक्क झाला आहे. मग उरले प्रश्न किती द्यावा? कसा द्यावा? कधी द्यावा. किती द्यावा हे मुलांच्या वयावर आणि आपल्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून आहे. मध्यमवर्गियांच्या मुलांना मिळणारा पॉकेटमनी आणि उद्योगपतींच्या मुलांना मिळणारा पॉकेटमनी यात प्रचंड तफावत असेल. आज मध्यमवर्गीय पालक आपल्या एकुलत्या एक मुलास शिक्षण चांगले मिळावे म्हणून महागड्या शाळांत प्रवेश घेतात. नाईलाजाने मुलांना इतर विद्यार्थ्यांच्या बरोबरीने पॉकेटमनी द्यावा लागतो. वयाच्या सहाव्या-सातव्या वर्षापासून छोटयाप्रमाणांत पॉकेटमनी चालू होतो व वयानुसार (आणि महागाईनुसार) वाढत जातो.

पॉकेटमनी देण्यास सुरवात करण्यापूर्वी मुलांना दोन प्रश्न विचारावेत. आपल्याला पैसे कसे मिळतात? आणि पैसे कशासाठी हवे असतात? या क्षणी तुम्हाला संपूर्ण महिन्याच्या कष्टांची ओळख करून देता येते व पैशाने सर्व काही विकत मिळत नाही हे ही समजवता येते. लहान वयात मुलांना सर्व गोष्टी साध्या सहजसाध्या वाटत असतात. त्यामुळे पैसे जादुच्या दिव्याप्रमाणे लागतील तेव्हा पाहिजे तितके सहज (ए.टी.एम् मधून) मिळतात असे वाटते.

मुलांकडे पैसे चार मार्गाने येऊ शकतात. पॉकेटमनी, बक्षिस, मित्रांकडून उधारी आणि कष्ट करून. आजी, आजोबा, नातेवाईक, स्कॉलरशिप इत्यादि स्वरूपात मिळालेली रक्कम खर्च न करता त्यांच्या नावावर गुंतवावी म्हणजे लहानपणापासून बचतीची सवय लागते. खर्चावर नियंत्रण येते. मित्राकडून उधारी घेऊ नये पण घेतलीच तर लगेचच फेडून टाकावी आणि कष्ट करून पैसे मिळण्याची पण सवय लहानपणापासून लावता येते. या सर्व बावतीत मुलांशी चर्चा करावी. ज्याचे स्वत:चे व्यवसाय आहेत असे पालक आपल्या मुलांना आपल्या कार्यालयांत नेऊ शकतात. स्वागतकक्षाजवळील लहान कामे मुले सहज करू शकतात. सुटीच्या दिवसांत एखादा उपक्रम करू शकतात. या कष्टांचा योग्य मोबदला मुलांना देता येतो. मुलांना आपल्या उत्पन्नाचे कौतुक पॉकेटमनीपेक्षा जास्त असते.

आपल्या पगारासारखाच मुलांना पॉकेटमनी निश्चित तारखेस, ठराविक रक्कम द्यावी. लागेल त्याप्रमाणे मागितल्यावर देऊ नये. यावर नियंत्रण रहात नाही. दर महिन्यास पॉकेटमनीची रक्कम बदलत जाते. महिन्यातून एकदा किंवा दोनदा सुनिश्चित रक्कम द्यावी. संपूर्ण महिना त्यात भागवण्याची सवय लागते. सुरवातीस महिनाअखेर त्रासदायक होते, नंतर मुले खर्चाचे नियोजन करू लागतात.

मुलांना पॉकेटमनी द्यायला सुरवात करतांना शर्टाच्या खिशांत मावेल इतकी लहान नोंदवही द्यावी. खर्च कसा लिहावा हे दाखववे. सहाव्या-सातव्या वर्षापासून मुले आपला खर्च लिहू शकतात. या वयांत त्यांची नोंदवही तपासली तर त्यांचा 'इन्सल्ट' होत नाही. त्यांना लिहिण्यातल्या सुधारणा शिकवता येतात. मुले मोठी झाल्यावर याची सवय टिकून रहाते. आपण मुलांना पैसे देतो पण पैसे हाताळायला शिकवत नाही. पैशाची जवाबदारी शिकवत नाही. माझ्या काही परिचितांत आपल्या क्रेडिटकार्डबरोबर १४-१५ वर्षाच्या मुलांची 'ॲड ऑन' क्रेडिटकार्ड काढली आहेत. आई वडिल दोघेही नोकरी करीत असतील तर मुले लहानपणापासून पैसे हाताळू लागतात. माझी एक मैत्रिण मुलीला शाळेत संध्याकाळी बोर्नव्हिटा पिण्यासाठी रोज पंधरा रुपये देत असे. मी सहज विचारले ती रोज पिते कां. 'सहापैकी चार वेळा पिते, दोन वेळा इतर काही खाते पण संध्याकाळी घरी आल्यावर मला सांगते आणि उरलेले पैसे परत देते मग मीपण रागवत नाही.' आज ही मुलगी दहावीत आहे. घरातील लहानसहान आर्थिक व्यवहार ती सांभाळते. या उलट एका कुटुंबात आई वडिल नोकरीस जातात म्हणून मुलांना सांगून ठेवले आहे पैसे लागले की या ठिकाणचे घ्या, मग मुलांचा पॉकेटमनी पाहिजे तितका वाढत जातो.

सद्याच्या काळांत आई बाबांना मुलांसाठी वेळ नाही. मग आपले प्रेम व्यक्त करण्यासाठी महाग खेळणी व भरपूर पॉकेटमनी दिला जातो. खर्चाचा हिशोब नाही. मागितला तर खरं उत्तर मिळण्याची शक्यता नाही. आपण सर्व एक मोठ्ठा टाईमबॉंब निर्माण करीत आहोत. कधी फुटेल माहित नाही. मुलांना जास्तीत जास्त (शक्य असेल तेवढा) वेळ द्या. पॉकेटमनी द्यावा लागणार नाही किंवा फार कमी द्यावा लागेल व ते जवाबदार नागरिक बनतील.

मला आलेल्या इमेलमध्ये एक गोरेगाववरून सौ. मृणालताईचा आहे. त्यांना दोन मुले आहेत. वय १८ आणि २१. दोघेही कॉलेजमध्ये आहेत. त्यांना स्कुटरसाठीचे पेट्रोलचे पैसे पॉकेटमनीमध्ये धरायचे कां? मृणालताई, पेट्रोलचा खर्च पॉकेटमनीमध्ये धरणे आवश्यक आहे. कॉलेज/क्लास घरापासून किती दूर आहे? दरमहा किती लिटर पेट्रोल लागू शकते त्या पेक्षा दोन लिटर जास्त हिशोबात धरा व एकूण महिन्याची पॉकेटमनीची रक्कम निश्चित करा. दर महिन्याचा खर्च लिहिण्यास सांगा. खर्चावर नियंत्रण आपोआप येते. मोबाईलचा टॉकटाईम संपत आल्यावर बोलण्यावर येते तसे. खर्चाच्या तपशिलांत मैत्रिणी बरोबर सिनेमाला गेलो लिहिले असेल तर चिडू नका. या उपाययोजनांमुळे आज तुमची मुले तुमच्यावर आणि सल्ला देणाऱ्या माझ्यावर नाराज होतील. परंतु, अजून पाच वर्षांनी दोघांनाही दुवा देतील.



जयंत विद्वांस
9892202011
jayantvidwans61@rediffmail.com

# सफर कैलास मंदिराची

-चित्रा वाघ

वेरुळच्या कैलास मंदिराच्या मुख्य दरवाजातून आम्ही आत गेलो तेव्हा तिथे फारशी वर्दळ नव्हती. जी होती ती लेण्यांमधल्या उंच उंच भव्य मूर्तींपुढे अगदीच नगण्य, खुजी वाटत होती. त्यातही हौशे, गवशे अशी सर्व प्रकारची माणसं दिसत होती. प्रत्येक मूर्तीपुढे उभे राहून काहीतरी चित्रविचित्र पोझेस देऊन स्वत:चे फोटो काढणाऱ्यांचा उत्साह कधी कमी होतो आणि ते बाजूला झाल्यावर मूर्ती आपल्याला व्यवस्थितपणे कधी बघायला मिळते याची मात्र जवळपास सर्वच ठिकाणी प्रतिक्षा करावी लागत होती.

शतकानुशतकाचा वादळवारा, पाऊस अंगावर झेलत, धार्मिक आक्रमणांच्या दुर्दैवी आघातांना सोसत आजही आपल्या सौंदर्याने, प्रमाणबध्दतेने आणि भव्यतेने बघणाऱ्याला खिळवून टाकणाऱ्या इथल्या पाषाणमूर्ती काही वेगळीच अनुभूती देतात. सुमारे २०० वर्ष, १० पिढ्यांनी उन्हातान्हात राबून साकारलेला कलाविष्कार क्षणोक्षणी आपल्याला स्तिमित करतो. मंदिराच्या बाहेरील भिंतींवर महाभारतातील अनेक प्रसंग कोरलेले दिसतात. ठिकठिकाणी हिंदू देवदेवतांच्या भव्य पण सुबक मूर्ती आपलं लक्ष वेधून घेतात. इ.स.पूर्वी ७०० ते ९०० वर्ष इतक्या प्राचीन काळातील राष्ट्रकूट राजांच्या कारकिर्दीत ही लेणी बांधण्यात आली असावी असे अभ्यासकांचे मत आहे. मुख्य मंदिराचा भाग सोडला तर बाजूची सर्व लेणी दुमजली आहेत.

इतका प्रचंड, एकसंध पाषाणाचा कडा पोखरून त्यातून असे भव्य मंदिर साकारावे ही कल्पना कशी आणि कुणाच्या डोक्यात सर्वप्रथम आली असेल? हा संपूर्ण आराखडा कुणी तयार केला असेल? एका वेळेला कितीजण इथे अहोरात्र खपले असतील? प्रत्येक कारागिराला नेमून दिलेल्या पाषाणखंडातून त्याने कुठले शिल्प कोरायचे आहे याचा तपशील त्याला कशा स्वरूपात मिळाला असेल? शेकडो कारागीरांचे कसब इथे पणाला लागले असणार. मग सर्वच मूर्तींच्या शैलीत, घाटात साम्य कसे? दगडी मूर्ती कोरताना जर चूक झाली तर तिची दुरुस्ती कशी केली जात असेल? की मूर्तींच्या चेहऱ्यावरचे भाव, बारीक तपशील कोरण्याचे काम काही ठरावीक अतिकुशल कारागीरांकडे सोपवले जात असेल? उंच छतावरचे कोरीवकाम तर इतके अप्रतिम आहे, की ते न्याहाळताना आपली मान दुखायला लागते. मग डोक्यावरचे, इतक्या उंचीवरचे कोरीवकाम, तेही डाव्या उजव्या बाजूला तोल व्यवस्थित सांभाळून ही प्रमाणबध्द शिल्प कशी कोरली असतील? कुठल्या प्रकारची हत्यारं वापरली असतील? या असंख्य कुशल कलाकारांची कुठलीही नोंद इतिहासाने घेतलेली दिसत नाही. काही गुहांमधले कोरीवकाम बघतानासुध्दा टॉर्चची मदत घ्यावी लागते. सूर्यप्रकाशही पोहोचू शकत नाही अशा या गुहांमध्ये काम करताना इतक्या प्राचीन काळात काय साधनं वापरली असतील? इतक्या दूर, गर्द जंगलाने वेढलेल्या ठिकाणी हे कारागीर



कस राहिले असतील? त्यांचे कुटुंबीय त्यांच्या बरोबर असतील का? असे असंख्य प्रश्न मनांत उभे राहतात आणि शेवटी एक मूलभूत प्रश्न डोकं वर काढतोच. हे का केले? आपले अवघे आयुष्यच नव्हे तर मागच्या पुढच्या कित्येक पिढ्यांनी हातात छिन्नी हातोडा घेऊन ह्या पाषाणांच्या संगतीत घालवले, ते कशासाठी? कुठल्या प्रेरणेने? की कुठल्या दबावाने? कदाचित जुलूम जबरदस्तीने? यातल्या कित्येकांना त्यांच्या हयातीत मंदिराचे दृष्यस्वरूप नजरेलाही पडले नसेल.

एकीकडे मनातल्या अशा प्रश्नांचं ओझं सांभाळत, दुसरीकडे त्या अद्‌भूत सौंदर्याने भारावून जात आम्ही एकेक तपशील न्याहाळत होतो. एका प्रचंड मोठ्या कड्याचा काही भाग वरून फोडण्यात आल्याचे दिसते. त्यातून अर्धवर्तुळाकार चर खणून मग मधल्या अखंड शीलाखंडाचे पुन्हा तीन मुख्य भाग करून हे कैलास मंदिर कोरलेले आहे. मंदिराच्या बाहेर पडल्यावर बाजूने त्या कड्यावर एका छोट्या चढणीवरून जाता येते. तिथून खालचे मंदिर बघताना आपण अक्षरश: भारावून जातो. त्याचा प्रचंड आवाका, अद्‌भूत रचना, प्रमाणबध्दता आणि नजर खिळवणारं सौंदर्य खऱ्या अर्थाने जाणवतं. मागच्या बाजूच्या एका छोट्या मंदिराचे काम अपूर्ण राहिलेलेही वरून लक्षात येते. यामध्ये कळसाच्या नेहमीच्या गोलाकार सुबक जागी दोन ओबडधोबड शीळा दिसतात, ज्याचे कोरीवकाम काही कारणाने अर्धवट राहिले असावे. खालून मात्र असं सगळं काम जवळजवळ पूर्ण झालेलं आहे. या अपूर्ण रचनेवरून हे बांधकाम कुठल्या क्रमाने

केले गेले असेल याचा थोडाफार अंदाज बांधता येतो.

या लेण्यांची भव्यता समजून घ्यायची असेल तर मंदिरालगतच्या या टेकड्यावर जाण्याखेरीज पर्याय नाही. तिथून मुख्य मंदिराच्या आधी जो विस्तीर्ण सभामंडप आहे त्याच्या सपाट छतावरचे सुंदर कोरीवकाम बघता येते. या छतावर आक्रमक पवित्र्यातल्या चार सिंहांची शिल्पं आहेत. आपल्यावर कुणी हल्ला तर करत नाहीत ना याची मान वळवून खात्री करणारे, जबडा वासलेले सिंह. यातला प्रत्येकजण एकेका दिशेला तोंड करून उभा आहे. कितीही प्राचीन राज्यकर्ता घ्या, आपल्या साम्राज्यावर कुणी हल्ला तर करणार नाही ना ह्या चिरंतन धास्तीपासून त्याची सुटका नाही. या शिल्पांवरून आपण हे निश्चित म्हणू शकतो की ही शिल्पं, ही प्रचंड लेणी साकारावी ही कुठल्यातरी राजवंशाची महत्वाकांक्षा असावी जी त्यापुढच्या कित्येक पिढ्यांकडे संक्रमित झाली.

याउलट कुठल्याही ठिकाणची बौध्द लेणी पाहताना ही आक्रमणाची भीती कुठे व्यक्त होत नाही. मानसिक शांतता लाभावी, व्रतस्थपणे आयुष्य व्यतीत करण्याची किंवा तप:चरणाची व्यवस्था असावी या उद्देशाने बरेचदा मानवी वस्तीपासून दूर बौध्दलेणी खोदलेली दिसतात. तिथे पुढच्या सर्व पिढ्यांपर्यंत आपल्या कर्तृत्वाच्या निशाण्या पोहोचाव्यात असा आग्रह निश्चितच दिसत नाही.

असे विचार करता करता टेकडीवरून आम्ही खाली उतरत होतो. समोर रंगीबेरंगी फुलांच्या ताटव्यांनी बहरलेल्या बागेचे दृष्य अतिशय सुंदर दिसत होते. चिंचेच्या झाडासारखे उंच डेरेदार कडुलिंबाचे वृक्ष तर इथे ठिकठिकाणी आहेत. यातील प्रत्येक वृक्षाभवती सुबक पार बांधण्यात आले आहेत. अनेक पर्यटक त्यावर बसून श्रमपरिहार करत होते. अचानक खालच्या प्रवेशदाराजवळ गडबड जाणवली. कुठल्यातरी शाळेची ट्रिप आली होती. ६-७ वर्षाच्या मुलांची लांबच लांब रांग, रंगीबेरंगी स्वेटर्स घालून दोघादोघांच्या जोड्या करून आत शिरत होती. मुलांची चिवचिव अखंड चालू होती. त्यातल्या एकाचेही लक्ष आजुबाजूच्या अद्‌भूत शिल्पांकडे जात नव्हते ही गंमत. आपआपसातच गमती जमती करत ती छोट्या छोट्या अनवाणी पायांनी भराभर चालत होती. मध्येच त्यांच्या शिक्षिकेने त्यांना तोंडावर बोट ठेवून समोर बघत चालायची सूचना केली. लगेच प्रत्येकजण एक हात जोडीदाराच्या हातात आणि दुसऱ्या हाताचे पहिले बोट तोंडावर ठेवून पुढे सरकायला लागला. इतक्या निरागस आज्ञापालनाचं ते दृष्य खरोखर लोभसवाणं दिसत होतं. मलाही जरा गंमत करायची लहर आली. शिक्षिका सांगत होत्या, 'पुढे बघून चाला!' मी वरून ओरडले, 'ए, वर बघा!'. चारपाच जणांनी चटकन आमच्या दिशेने पाहिले. आम्ही टाटा केल्यावर मुलं हसऱ्या चेहऱ्याने वर बघून हात हलवत पुढे चालायला लागली. चालताना आधारासाठी किंवा उत्सुकता म्हणून ती छोटी मुलं आपल्या चिमुकल्या हातांनी त्या शिल्पांना स्पर्श करत होती. त्या स्पर्शातून धीरगंभीर, गूढ लेण्यांमध्ये चैतन्याने प्रवेश केल्यासारखा वाटला.

पुनरुत्पादन ही सजीवांची आदिम, नैसर्गिक प्रेरणा! आपल्यासारखा जीव जन्माला घालावा, वंशसातत्य टिकावं ही मूलभूत ओढ. म्हणजे कुठेतरी आपल्या खुणा मागे राहाव्या हीच अंतिम इच्छा. या कैलास लेण्यासारखी भव्य दिव्य मंदिरं खोदण्यामागे हीच अनादि कालापासून चालत आलेली प्रेरणा असावी. आपली कला, आपल्या संस्कृतीच्या खाणाखुणा, आपल्या देवदेवता, आपल्या धार्मिक संकल्पना, परंपरा हे सगळं पुढच्या, त्याच्यापुढच्या आणि त्याच्याही पुढच्या अनेक पिढ्यांपर्यंत सुपूर्द व्हावं, संक्रमित व्हावं हा एकमेव ध्यास यातल्या प्रत्येक शिल्पामध्ये दिसत होता. शतकानुशतकांपूर्वी या भूमीवर वापरलेल्या आपल्या पूर्वजांशी नकळत एक धागा जोडला जात होता. अलौकिक कलानिर्मितीतून आपल्यापर्यंत पोहोचू पहाणाऱ्या त्या अनाम शिल्पकारांप्रती आदराबरोबरच आपलेपणाची भावना निर्माण होत होती. त्याचबरोबर मनातल्या एकेका कोड्याचा उलगडा होत होता.




**-चित्रा वाघ**

9821116936

chiwagh@gmail.com


## सूचना, कल्पना..

स्वयम् अधिक सुंदर व वाचनीय व्हावा यासाठी वाचक सूचना-

स्वयम्, पृष्ठ क्र ३ वर, कृपया नोंद घ्यावी.

राजकीय बातम्या, राशीभविष्य बॅन ठीक आहे, पण कविता.....

कविता ह्या मनाच्या गाभाऱ्यातून, लेखणीतून उतरतात. माणसाच्या मनाचे प्रतिबिंब असतात. थोडक्या व मोजक्या योग्य शब्दातून फार मोठे विचार, अर्थ सांगून जातात. लेखापेक्षा जागा पण कमी व्यापतात. कविता सुचणं, लिहिणं, स्फुरणं ही एक निसर्गाची देणगी आहे.

कविता ह्या कोशिंबिरीची जागा चालवतात. ताटात जर कोशिंबीर नसेल तर.....कोशिंबीर ही हवीच. थोडी व चविष्ट. कोशिंबीर जेवणाची लज्जत दुगुणी करते.

जशी देवापुढे रांगोळी, दारासमोर रांगोळी तशी मासिकांत कविता. कोपऱ्यात असते पण शोभून दिसते !

तरी वरील विचारांचा, विचार व्हावा. नम्र विनंती, आग्रह नाही.....पण....मनांत जो विचार आला, तो मैत्रिणीच्या कानांत...सांगावासा वाटला...

पटला तर आपला, नाहीतर फक्त माझा.. विचार!


प्रेषक

स. क्र. २७२५

रश्मी रमाकांत ठोसर

९६ / ३, महावीर सुख,

आंबेडकर रोड, दादर (पूर्व)

# निद्रासन

**- अनिल हर्डीकर**

निद्रासन हे एक करण्यास सोपे आणि उत्तम स्वास्थ्यासाठी सर्वोत्तम असे आसन आहे. योगाभ्यास करणारी मंडळी यास 'झोप'असे नाव देऊन त्याची अवहेलना करतात. मुळात या दोन्ही कृतींमध्ये साम्य असलं तरी बघण्याची दृष्टी बदलली तर केलेले आसन अंगी लागते, असा जाणकारांचा दावा आहे.

ज्याप्रमाणे संगीतात एखाद्या रागात अनेक चीजा असतात त्याप्रमाणे निद्रासनामध्ये अनेकविध सूक्ष्म फरकाचे प्रकार आहेत. आपण एकेका प्रकाराचा तपशीलवार अभ्यास करण्यापूर्वी मूळ निद्रासनाची पद्धत लक्षात घेऊ.

निद्रासन कुणीही, कुठेही, कसेही, कितीही वेळ, कितीही वेळा करू शकतो. इतक्या सवलती असलेलं लवचिक आसन अन्य कोणतेही नाही.

निद्रासनासाठी पाठ टेकायला मिळणे आवश्यक आहे. ते एकदा केले की दोन्ही पाय एका दिशेला व डोके विरुद्ध दिशेला असणे महत्त्वाचे आहे. (बुद्धिमत्ता या अर्थाने इथे 'डोके' शब्द वापरलेला नाहीये, तेव्हा मनातली भीती दूर करा.) डोळे मिटणेही गरजेचे आहे. (कायमचे डोळे एकदाच मिटता येतात पण निद्रासनात डोळ्यांची उघडझाप आयुष्यभर चालू ठेवता येते.)

निद्रासनासाठी आसन म्हणून मऊ गादी उपलब्ध झाली तर उत्तम, अन्यथा लादीवर करणेही सुलभ व सोयीचे ठरते. या आसनासाठी ठेंगू व्यक्तींना कमी तर उंच व्यक्तींना थोडी जास्त जागा लागते. डोक्याखाली उशी घेतली तर उत्तम. वीट, दगड यांचाही वापर डोक्याखाली करता येईल. (दगडावर दगड रचलेले आपण पाहतोच की!) डोक्याखाली काय आहे, काय असावं याचा डोक्याला ताप नको, उगाच एकाग्रता ढळणार नाही हे पाहा.

निद्रासनात श्वासोच्छ्वासाला महत्त्व नाही. जी गोष्ट आपोआप होते, त्यावर नियमांचे बंधन आणणे या आसनाला अमान्य आहे.

हे आसन कोणत्याही ऋतूत करता येते. कर्त्याने ते कसे करावयाचे ते ठरवायचे. उन्हाळ्यात ते पंख्याखाली अथवा वातानुकूलित खोलीत करावे. या आसनाला कपड्याचे बंधन नाही. (कोणते कपडे घालावेत? किंवा कपडे घालावेत कां? ) वर्षा ऋतूत हे आसन अंगावर पांघरुण ओढून करता अधिक आरामदायी वाटेल.

हे आसन कार्यबाहुल्यामुळे, वेळेचा अभाव असल्यास उभ्यानेही करता येते. (दोन पाय एका बाजूस व डोके दुसऱ्या बाजूस, डोळे बंद आणि श्वास चालू ठेवणे हीच कृती. मात्र हाताने काहीतरी धरणे गरजेचे आहे. लोकलच्या गर्दीच्या वेळात त्याचीही गरज नाही. गर्दीतलेच 'सपोर्ट' करतील.)

निद्रासन हे जेवणानंतर करणे सुलभ जाते, पण जेवणापूर्वीही हे करू शकता. त्यासाठी सिद्धी हवी.

निद्रासनातला परमोच्च बिंदू म्हणजे घोरण्याचा घुंकार. यात प्रत्येक आसनकर्त्याची स्वतंत्र अशी ओळख पटते. कामसू माणसांना हे आसन हवं तसं जमत नाही. त्यांना झोप लागते.

कामपिपासू (याला हिंदीत बिपाशा बासू म्हणतात) मंडळी कामोत्तर हे आसन करतात.

हे आसन करण्याची एकदा गोडी लागली की तुम्ही दुसऱ्या आसनांचा विचारही सोडून द्याल. तुमचा हेवा करणारे वाढतील, तुमचं समाजातलं 'वजन' वाढेल. ऑऽऽऽ.

जांभईचं आगमन झालं म्हणजे निद्रासनाची वेळ. भेटू या. ऑऽऽऽ.



**-अनिल हर्डीकर**
स. क्र. ५२७० | **9819421858**
hardikarsutradhar@gmail.com

**Advertisement Rates for SVAYAM**

| | 1 Time | 3 Times | 6 Times | Yearly |
|---|---|---|---|---|
| Colour Front Page | 10,000 | 30,000 | 50,000 | 1,00,000 |
| Colour Inner Front Page | 7,500 | 22,500 | 37,500 | 75,000 |
| Colour Inner Back Page | 5,000 | 15,000 | 25,000 | 50,000 |
| Colour Back Page | For Brahman Seva Mandal | | | |
| Inner Pages : Full Page B/W | 3,000 | 9,000 | 15,000 | 30,000 |
| Half Page B/W | 2,000 | 6,000 | 10,000 | 20,000 |
| Quarter Page - B/W | 1,000 | 3,000 | 5,000 | 10,000 |

Page Sponsor - Rs.500/-

# इत्यादी...

## हीरक महोत्सवी लक्ष्मणरेषा

-मुकुंद सराफ

**जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांचे २५ जानेवारी २०१५ रोजी वृद्धापकाळाने पुणे येथे दुःखद निधन झाले. त्यांच्या कलाकीर्दीवर व व्यक्तिमत्त्वावर झोत टाकणारा लेख त्यांना आदरांजली म्हणून..**



आज कमीत कमी ३०/४० वर्षे माझ्या दिवसाला सुरूवात एका हातात (स्वत: केलेल्या) गरम चहाचा कप आणि दुसऱ्या हातात, 'लक्ष्मणरेषा' पण आर केंची – अर्थात आर. के लक्ष्मण यांचं व्यंगचित्र असलेला पेपर अशी होते. आज इतकी वर्षे तुमच्या माझ्याच नाही त्यांच्या लाखो चाहत्यांची सकाळ एकमेवाद्वितीय अशा खुमासदार शैलीतल्या व्यंगचित्रांनी सोनेरी आणि प्रसन्न केली. आपल्यापैकी बहुतेकांनी शाळेत असताना 'एक दिवस वर्तमानपत्र आले नाही तर?' अशा प्रकारच्या निबंधामधे 'मला खूपखूप चुकल्या सारखे वाटेल' किंवा 'जगाशी संबंध तुटल्यासारखे वाटेल' अशा अर्थाचे वाक्य लिहिले असणार. आजही जर आर. के लक्ष्मण याचं एक कलमी व्यंगचित्र' "You said it" किंवा 'कसं बोललात' च्या खाली बघायला मिळालं नाही तर आपली अवस्था नेमकी तशीच होते. इतकी आपल्याला जणू सकाळच्या चहाइतके त्यांच्या व्यंगचित्राचे व्यसन लागले आहे असं म्हणायला हरकत नाही. आजही लक्ष्मण यांचं कुठलही व्यंगचित्र आठवलं की स्वत:च्याही नकळत हसू फुटतं आणि वाटतं की अरे हे आपल्याला कसं सुचत नाही? आणि नेमका हाच त्यांच्या व्यंगचित्राचा गाभा आहे, अगदी सामान्य माणसाच्या विचारांशी आणि सुखदु:खांशी सहज संवाद साधणं.

आर केंच्या व्यंगचित्रांच्या मालिकेप्रमाणे आपल्याही विचारांची मालिका सुरु झाली की एकेक व्यंगचित्र आठवणींच्या राज्यात घेवून जातं. चिनी आक्रमणाच्या वेळच्या व्यंगचित्रात चीनचे अध्यक्ष चाऊ अेन् लाय हिमालयावर चीनचे झेंडे लावता लावता बाजूला उभ्या असलेल्या नेहरुना विचारतात "Mr. Nehru will you mind if you go on talking and I go on working?" व्यंगचित्राचं शीर्षक होतं "Ready for talks"

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन् एफ् केनेडी यांच्या निधनावरच्या व्यंगचित्रात आकाशातून दिसणारा त्यांचा चेहरा व खाली अमेरिकेचा तारांकित राष्ट्रध्वज. खालचा मजकूर होता "The Fifty second star is born"

माझ्या आठवणीप्रमाणे नेहरु गेल्यानंतरच्याही व्यंगचित्रात फक्त मागे हातात हात गुंफलेले व हिरवळीवर फिरणारे पाठमोरे पंडितजी दाखवलेले होते. बांग्लादेशच्या युद्धानंतर लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या इंदिरा गांधी साडेतीनशेच्या घसघशीत बहुमताने निवडून आल्यावर साहजिकच अनेक मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्रीपदे निर्माण करायला लागली त्यावेळी जंबो मंत्रीमंडळाचा इंदिरांजीसमवेत फोटो काढताना स्वत: फोटोग्राफर सांगतो "Smile please! even who have been made Deputy Ministers"

दिल्लीमधे 1981 साली झालेल्या अेशियाड सामन्यांच्या वेळी त्यावेळचे माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्री वसंत साठे यांना रंगीत टीव्हीचे श्रेय मिळू नये म्हणून रातोरात त्यांना 'रसायने व खते' खाते देण्यात आले दुसऱ्याच दिवशीच्या व्यंगचित्रात खतांच्या ढिगासमोर उभ्या असलेल्या मंत्रीमहोदयांना त्यांचा सचीव म्हणतो 'साहेब,काही म्हणा तुमची रंगीत खते तयार करायची कल्पना मात्र भन्नाट आहे'.

दूरदर्शन सुरू झाल्यावर सुरवातीला रविवारी संध्याकाळी जुने हिंदी चित्रपट दाखवले जायचे. त्यावर भाष्य करणारे एक व्यंगचित्र एका गृहस्थांना दिवाणखाण्यातच झोप लागलेली आहे आणि त्याची बायको बाजूला बसलेल्या मैत्रिणीला सांगते 'लग्नाला इतकी वर्षे झाली तरी हे किंचितही बदलले नाहीत. लग्न झाल्या झाल्या आम्ही हा चित्रपट बघितला तेव्हा सुद्धा हे नेमके याच सीनला झोपी गेले होते.

'बिल क्लिंटन' चीनला भेट देणारे पहिले अमेरिकेचे अध्यक्ष. तत्कालीन चीनी अध्यक्षांशी हस्तांदोलन करताना बाजुला चीनी ड्रॅगनला अमेरिकन मिकी माऊसचा मुखवटा लावण्याची कल्पना फक्त आर के नाच सुचू शकते आणि यावर परत The President has succeeded in giving human face to the Dragon" अशा अर्थाची मल्लीनाथी होतीच.

बिहार मधल्या राजकीय अस्थिरतेला बराच इतिहास आहे एक काळ असा होता की आमदारांनी निवडलेला गेलेला मुख्यमंत्री हा आमदारांच्या हातातलं बाहुलं असायचा. अशाच एका नेता निवडीच्या बैठकीत बहुदा विश्वनाथ दास, नावाच्या आमदाराची विधिमंडळाच्या नेतेपदी निवड झाल्यावर "We have elected you as our leader, now please follow us" असं व्यंगचित्र दुसऱ्याच दिवशी झळकलं. महाराष्ट्राच्या बाबतीतसुद्धा अंतुले प्रकरणानंतर कुणाच्या ध्यानी मनीही नसलेल्या बाबासाहेब भोसल्यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागली. त्याप्रसंगावरचं व्यंगचित्र खूपच बोलकं होतं. आमदारांची नेतानिवडीसाठी खचून गर्दीत बैठक चालू आहे. त्यात इंदिरा गांधी एका आमदाराकडे बोट दाखवून म्हणतात "You are the next Chief Minister. What is your name? "

आर कें च्या चाणाक्ष नजरेमधून अे. पी जे अब्दुल कलामांची चेहऱ्यावर व मानेवर रूळणारी जुल्फेही सुटली नाहीत. त्या व्यंगचित्रात एकजण त्यांच्याशी बोलण्याच्या प्रयत्नात असताना "He started talking to him thinking that his face is on this side' हे असे दाखवणे दुसऱ्या कुणाला सुचणार?

अलिकडच्या काळातील मोबाईलचा अतिरेकही लक्ष्मणजींच्या व्यंगचित्रातून व्यक्त झालेला आहे एक जोडपे मोबाईलवर एकमेकांशी बोलत असताना घरातील बाई शेजारणीला सांगते. " Both of them know that they are in the same hall but they are so much addicted to mobile that they cant help it"

मंत्र्यांची आणि एकंदरीतच राजकीय नेत्यांची माईक समोर दिसला की भाषणबाजीला सुरूवात आणि आता तर काय cordless mike चा जमाना आहे. त्यामुळे अशाच एका समारंभात एका मंत्र्याचा पी. ए. आईस्क्रीमचा कोन त्यांना देतो आणि त्यावरही "He started speaking thinking that it is a mike"

असलं व्यंगचित्र साकारायला फक्त आर केंचाच कुंचला लागतो. मंत्र्यांच्या नातेवाईकांची भरती करण्याच्या सवयीवरची दोन व्यंगचित्रेही कायम स्मरणात रहाणारी आहेत. एकामधे चपराशाच्या वेशात शेजारी उभ्या असलेल्याला मंत्रीमहोदय बजावतात "How many times should I tell you not to call me uncle in the office?" तर दुसऱ्यामधे 'असाच' एक चपरासी 'साहेबांना' विचारतो "Uncle uncle

"what is nepotism?" आर केंच्या प्रत्येक व्यंगचित्रात आपल्याला सगळ्यात भावतो तो सदैव कुठेतरी कोपऱ्यात उभा असलेला. सदैव गोंधळलेला व भांबावलेला किंवा कुणाच्या तरी शब्दात 'भाषाळलेला' असंख्य प्रसंगांचा मूक साक्षीदार अर्थातच् The Comman Man किंवा 'एक सामान्य माणूस' पण त्यांचा व्यंगचित्रांमध्ये प्रवेश का व कसा झाला असेल याचा किस्साही तसाच रंजक आहे. अगदी सुरवातीला गर्दी दाखविण्यासाठी 'पंजाब सिंध गुजरात मराठा, द्राविड उत्कल वंग' अशा देशातल्या सर्व राज्यातल्या व भाषांतली माणसे एकत्र आर. के. दाखवायचे तेही त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चेहेऱ्यांसह. पण मग त्यांच्या असं लक्षात आल की एखाद्या जाहिरातीत कंपनीच्या ऑफिसप्रमाणे Everything is wanted here yesterdays हाच वृत्तपत्राच्या ऑफिसमधलाही अलिखित कायदा आहे. अगदी ताजी बातमी किंवा घटना असो नाहीतर प्रसंग त्यावर आधारीत व्यंगचित्र ताबडतोब प्रसिद्ध झालं नाहीतर गार झालेल्या चहासारखं वर्तमानपत्रही शिळं होतं. मग पहिल्या पानावर ठराविक ठिकाणी छापलं जाणारं आर कें चं व्यंगचित्र तर एका अग्रलेखाचा परिणाम साधणार. कारण वृत्तपत्र क्षेत्रातल्या एका अधिकारी व्यक्तीनी म्हटल्याप्रमाणे "Give me a good cartoonist, I will sack half the staff in my editorial department.'

त्यामुळे इतकं महत्वाचं व्यंगचित्र रोजच्या रोज जागच्या जागी आणि वेळच्या वेळी छापून घेण्यासाठी आर के च्या कल्पनाविश्वामधून साकारला तो चौकडीचा कोट व आखूड घोतर, वयपरत्वे आलेलं डोक्यावरचं टक्कल व गोल काचांचा चष्मा असलेला फुगीर नाकाचा व आखुड मिशांचा आणि चेहऱ्यावर सदासर्वदा निष्पाप भाव असलेला 'सामान्य माणुस' आणि देशातल्या कोट्यावधी जनतेचे सर्वार्थाने प्रतिनिधित्व करणारा खराखुरा सामान्य माणूस. आपल्या कुंचल्यातून सामान्य माणसांची सुखदु:खे, व्यथा, काळज्या, प्रश्न आर के लक्ष्मण यांनी ज्या समर्थपणे व यशस्वीपणे साकारली त्याला वृत्तपत्रीय व्यंगचित्रांच्या इतिहासात तोड नाही. मग तोच 'सामान्य माणूस' आर के. लक्ष्मण यांची इतकी ओळखच बनून गेला की त्यांची गणना 'असामान्य' व्यंगचित्रकारात कधी झाली हे त्यांचे त्यांनाही समजले नसेल. आज पन्नास वर्षाहूनही अधिक काळ व्यंगचित्राच्या माध्यमातून आर के आपल्याला रोजच्या रोज भेटत आहेत. अगदी आजतागायत व्यंगचित्राचा विषय मग राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कुठलाही असो प्रत्येकाला जणू आपलीच आरशातली प्रतिमा वाटणारा त्यातला सामान्य माणूस सगळ्यांच्याच जवळचा व जिव्हाळ्याचा होऊन गेला. बरं, व्यंगचित्रांचे विषय तरी किती साधे-सोपे आणि आपल्या रोजच्या प्रश्नांशी निगडीत असावेत?. अगदी रस्त्यावरचा कचरा, खड्डे, फुटपाथ वरचे फेरिवाले व झोपड्यांचं आक्रमण, वाहतुकीची कोंडी, पाणी व विजेची टंचाई, दंगे धोपे, संप, बेरोजगारी, भ्रष्टाचार, सरकारी कामातील दिरंगाई व भ्रष्टाचार, राजकारणी व गुंडांची हात मिळवणी, चोरी, बलात्कार, निवडणुका व आश्वासने, शिक्षण क्षेत्रातील गोंधळ , महागाई, काळाबाजार एक ना दोन - शेकडो, पण सगळ्यात मजा व आश्चर्य म्हणजे इतके वर्षे हाताळले गेलेले अगणित विषय आजही ताजेतवाने वाटावेत हा प्रशासन यंत्रणेचा पराभव की आर् के लक्ष्मण यांचा द्विविजय?.

खुद्द लक्ष्मण यांनीच एके ठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे एक खगोल शास्त्रज्ञ दुर्बिणीतून पहात असलेल्या व्यंगचित्राखाली मजकूर होता 'चन्द्रावर नक्की नागरी जीवन असणारच! पहा पहा त्या साऱ्या खड्ड्यांकडे'

आर के चा सामान्य माणूस नारदा सारखा त्रैलोक्यसंचारी असल्याने त्यांच्या प्रत्येक व्यंगचित्राने त्याचं अस्तित्व इतकं अत्यावश्यक केलं आहे की त्यांच्याच शब्दात सांगायचं झालं तर 'एका मंत्र्याबरोबर दक्षिण ध्रुववावरील पेंग्वीन पक्षाबरोबर झालेल्या द्विपक्षीय चर्चेलाही तो हजर आहे'

वर्षाला ३६५ या हिशेबाने त्यांनी काढलेल्या व्यंगचित्रांची संख्या किमानपक्षी २५ ते ३० हजाराच्या घरात जायला हरकत नाही. स्वत: आर के. लक्ष्मण यांना मुलाखतीत एक प्रश्न विचारला गेला होता "What is your messege to the young cartoonists? आणि त्यांच उत्तर होत " Please bear in mind that your best cartoon is yet to be born!" ते वाचल्यावर अशाच दोन उत्तुंग व्यक्तीमत्त्वांच्या आयुष्यातील प्रसंगांची अपरिहार्यपणे आठवण झाली. अहमद जान थिरकवाँ नव्वदीकडे झुकलेले असताना झालेल्या एका मैफिलीनंतर कुणीतरी म्हणालं ''उस्तादजी आज आपने तीन ताल क्या बजाया!'' त्यावर तबलानवाज म्हणाले ''भैय्या अभी अभी तो हमे तीन ताल का अन्दाज आने लगा है'' तर भारतरत्न भीमसेन नाही ''आज आपण यमन काय गायलात हो'' त्यावर पंडितजी उद्गारले ''अरे कसचं काय! आम्हांला जो यमन गायला तास दीड तास लागतो ना तो ती लता तीन मिनिटात सादर करते'' आर के. थिरकवाँ किंवा भीमसेनजी अशी दुर्मिळ व्यक्तिमत्वे 'विद्याच नाही तर कला विनयेनं शोभते' म्हणून तर महान ठरत नाहीत ना?



-मु.गो. सराफ
9930775375, 02226836069
mukundsaraf@gmail.com

The END

कथापूर्ती

# धडा

तरी दहा अकरा वर्षे झाली असतील या गोष्टीला. मी चर्चगेटला काही कामानिमित्त लोकलने चाललो होतो. वेळ दुपारची. गाडीने दादर सोडले आणि डब्बा बऱ्यापैकी रिकामा झाला.

माझ्या समोरच्या खिडकीत एक मध्यमयीन माणूस हातात बॅग घेऊन बसला होता. त्याने बॅग मांडीवर घेतली, उघडली आणि आतला एक एक शब्द वाचून, नको असलेले कागद फाडून त्याने डब्यात बिन दिक्कत टाकायला सुरवात केली. हवे असलेले कागद तो व्यवस्थित लावून ठेवत होता.

बघता बघता त्याच्या पायाशी फाडलेल्या कागदांचा ढीग जमा झाला. मी हे सगळे पहात होतो. काय आणि कसे बोलायचे हे कळत नव्हते. रक्त उसळत होते, हात शिवशिवत होते. तो एका विमा कंपनीचा प्रतिनिधी असावा. मारून, शिव्या देऊन काहीच साध्य झाले नसते हे त्याचे 'कचरा निर्मुलनाचे' कार्य चालू असताना तो माझ्याकडे पहात नव्हता.

गाडी मरीन लाईन्स आणि चर्चगेटमध्ये सिग्नलची वाट पहात थांबली होती. मी म्हणालो, 'आपले कार्ड द्याल का?', त्याने तत्परतेने कार्ड दिले, माझ्याकडे कार्ड मागितले, मी माझ्याकडे कार्ड नसल्याचे सांगितले. चर्चगेटला आम्ही दोघे उतरलो. त्याला मी संभाव्य ग्राहक वाटत होतो, मी मात्र त्याच्या बेजबाबदार वागण्याचा धडा शिकवायचा निश्चय केला होता......

(या कथेचा शेवट करून वाचकांनी पोस्टाने अथवा इमेल द्वारे पाठवावा. अंतिम तारीख २० फेब्रुवारी २०१५)

# शाळेतली कविता

## गरीब बिचारा माधुकरी....


- उदय जोशी

पूर्वीच्या बालभारती पुस्तकात एक कविता असायची, 'गरीब बिचारा माधुकरी' आणि त्याबरोबर एका डोक्याला शेंडीचा घेर आणि हातात काठी असलेल्या एका ब्राह्मण मुलाचे चित्र असायचे. हे चित्र त्याआधीच्या काळातल्या ब्राह्मण मुलाचे प्रतिनिधित्व करत होते. अतिशय गरीब घरातली (बहुतांशी कोकणस्थ) ब्राह्मण मुले त्याकाळी कोकणातून पुणे, मुंबई, कोल्हापूर या सारख्या शहरात केवळ शिक्षणासाठी यायची आणि मिळेल तिथे कसल्याही परिस्थितीत रहायची. त्या मुलांच्या अंगात जिद्द होती, मनात ईर्षा होती, कुशाग्र बुध्दीची साथ होती आणि मनगटात धमक होती. त्यांच्या डोळयात स्वप्ने असायची ती उत्तम शिक्षण घेऊन जन्मजात दारिद्रियातून बाहेर पडण्याची आणि स्वत:बरोबरच आपल्या कुटुंबाली देखील वर आणायची. परंतु, स्वप्न आणि वास्तवात बराच फरक होता. त्यावेळचा काळ पाहता हे स्वप्न वास्तवात आणणे सोपे नव्हते.
शहरात संधी होत्या, शिक्षणाची साधने होती, पण पोटाचे काय? या अनोळखी शहरांमधून जेवायला कोण घालणार? मोठाच प्रश्न होता. पण म्हणतात ना, दारिद्रिय माणसाला बरेच काही शिकवते आणि करवूनही घेते. त्यावेळच्या ब्राह्मण समाजाने या प्रश्नावरही तोडगा काढला आणि त्यातूनच जन्म झाला माधुकरी आणि वार लावून जेवण्याच्या प्रथेचा. या प्रथेने ब्राह्मणांच्या एका पिढीला नवा जन्म दिला. त्यांचे चिकाटी आणि शिकण्याची तीव्र इच्छा हे बावनकशी गुण या माधुकरीच्या भट्टीतून उजळून निघाले.
ही मुले वार लावून जेवायची. याचा अर्थ सात दिवस सात घरांमध्ये यांची फक्त एका वेळच्या जेवणाची सोय व्हायची. बरं तेव्हाचे यजमानही काही श्रीमंत नव्हते. तरीही जमेल तसा ते आपल्या घासातला घास काढून देत होते. या सर्व व्यवहारालाही एक पध्दत होती, शिस्त होती. ती अशी की, वारावर असलेल्या मुलाने दरवाजात उभे रहायचे आणि घरातल्या व्यक्तिने सांगितल की मगच पानावर बसायचे. जे काही पानात पडेल ते खायचे. तक्रार करणे किंवा मागून घेणे तर विसराच. अशा परिस्थितीत आणि अशाप्रकारे अन्न खाऊन नंतर अभ्यास करायचा, उत्तम गुण मिळवायचे आणि पुढे शिकत जायचे. या प्रकारे त्या काळी अक्षरश: हजारो ब्राह्मण मुले शिकली आणि त्यांनी आपल्या कर्तृत्वाने दशदिशा उजळल्या. माझ्या वडिलांच्या वेळची ही पिढी. माझे वडील कितीतरी गोष्टी सांगायचे, कारण मूर्तीमंत दारिद्रिय त्यांनीही अनुभवले होते. केवळ कष्टाने परिस्थितीवर मात करणाऱ्या त्या पिढीबद्दल आज कमालीचा आदर वाटतो. आम्हा कोकणस्थांच्या काटकसरी राहणीबद्दल टोमणे मारणे ही गेली अनेक वर्षे एक फॅशन झालीय. अगदी कबूल आहे की माझ्या वडिलांच्या वेळची पिढी होतीही तशी पण त्याची मूळे या अशाप्रकारे केलेल्या कष्टामध्ये दडलेली होती. त्या पिढीला पैशाची किंमत कळली होती आणि खिशात पैसे नसले की काय काय सहन करावे लागते ते ही त्यांनी अनुभवले होते. आमच्या आयुष्याचा पाया त्यांच्या काटकसरीमुळे भक्कम झालाय. आज सुखाचे आयुष्य जगताना आम्ही त्यांच्या कष्टांना विसरलेलो नाही. बालभारती मधली कवी श्रीधर बाळकृष्ण रानडे यांची ही कविता-

**गरीब बिचारा माधुकरी ।**
**दु:ख तयाला जन्मभरी ।।**
**कडक उन्हाने जीव घाबरे ।**
**गालावरूनी घाम ओघळे ।।**
**पायी चटके, तापे डोके ।**
**धापा टाकत पळे जरी ।।**
**बुरबुर लागे पाऊसधारा ।**
**चिखल माखला अंगी सारा ।।**
**घट्ट तपेली झोळी धरली ।**
**धावत जातो घरोघरी ।।**
**भण भण झोंबे वारा अंगा ।**
**तळपायाला पडल्या भेगा ।।**
**हात कापती दात वाजती ।**
**कुडकुडतो हा घडोघडी ।।**
**विटक्या अपुऱ्या मुकट्यावाचुनी ।**
**वस्त्र तयाला मिळे न कोठुनी ?**
**जरी ना सोवळे असे नेसले ।**
**मिळे ना त्या तरी माधुकरी ।।**
**सण आनंदी घरोघरी जरी ।**



**नित्य कपाळी सुटे ना वारी ।।**
**शिळी बुरसली खवट आंबली ।**
**अशीच नशिबी सदा भाकरी ।।**
**उशीर कोठे कुठे संपले ।**
**मिळे कालवण भाग्य उदेले ।।**
**नवा धरिली करी तपेली ।**
**अश्रू तोंडी घास गीळी ।।**
**झोळी थोडी अजुनी ना भरली ।**
**शाळेची तर घंटा झाली ।।**
**मुख हिरमुसले घास कोंबले ।**
**दप्तर घेऊनी पळे जरी ।।**
**शिळे त्यातले रात्रीकरता ।**
**निजे उपाशी अपुरे पडता ।।**
**कुणा कळवळा येई बोला ।**
**कोण तयाची कीव करी ।।**
**नंबर गेला एक खालती ।**
**जाईल नादारी ही भीती ।।**
**सांजसकाळी अभ्यासच करी ।**
**फुरसत खेळा कुठे तरी ।।**
**गोसावी भट धन्य भिकारी ।**
**तेलंग्याचे भाग्य किती तरी ।।**
**पैसा दूरच पुस्तक धोतर ।**
**जुने द्यावया नसे घरी ।।**
**निजे कुणाच्या ओटीवरती ।**
**अर्धे धोतर खाली वरती ।।**
**एकच सदरा तोच उशाला ।**
**दया ना येते जागा परी ।।**
**यजमानाला पलंग गिरदी ।**
**आत उकडते खुपते गादी ।।**
**पोटी धरून पाय जुळवुनी ।**
**कुडकुडतो हा रात्रभरी ।।**
**पुण्यात आला अभ्यासाला ।**
**पदोपदी जग अडवी त्याला ।।**
**विद्या करतो हाल सोशितो ।**
**शूर नव्हे का खरोखरी ।।**
**गरीब बिचारा माधुकरी ।।**




-उदय जोशी
9819445453
Uday6000@yahoo.com

## जीवनात ही घडी अशीच राहू दे !

- अनिल गोविलकर

आपल्याकडे एक समज काहीसा दृढ झालेला आहे. चित्रपटातील गाणी आणि खाजगी गाणी यात फरक करताना शब्दकळा, वाद्यमेळ आणि गायकीत फरक केला जातो. थोडक्यात, दर्जा म्हणून बघताना खाजगी गीतात शब्दकळा समृध्द, तसेच मोजका (च) वाद्यमेळ आणि गरज नसताना गायकीतला फरक दाखवला जातो. जणू काही चित्रपट गीतांत याची कसलीच गरज नसते. यादृष्टीने पुढे जाऊन अशी देखील वर्गवारी केली जाते - खाजगी गाणे म्हणजे शास्त्र आणि चित्रपट गाणे म्हणजे कलात्मकता असा (खरंतर खुळचट) फरक केला जातो. वास्तविक, चित्रपटात अशी कितीतरी उदाहरणे दाखवता येतील, जिथे या समजाला छेद देता येतील. विशेषत: मराठी चित्रपटातील बरीच गाणी दर्जा म्हणून फार उजवी आहेत. मोजका वाद्यमेळ, सशक्त कविता आणि तितकाच विलोभनीय गायकी अविष्कार.

'जीवनात ही घडी अशीच राहू दे', हे गाणे असेच अप्रतिम गोड आहे. सहजसुंदर काव्यरचना, लोभस चाल आणि त्या चालीचे अत्यंत सुश्राव्य सादरीकरण. या गाण्याची एक गंमत आहे. या गाण्याचा कवी आणि संगीतकार एकच आहे - यशवंत देव. तसे बघितले रुढार्थाने यशवंत देव हे काही कवी नाहीत. पण शब्दांची जाण त्यांची निश्चित वाखाणण्यासारखी आहे. 'स्वर आले जुळुनी' सारख्या अजरामर रचनेची शब्दकळा देवांचीच.

कुठल्याही गाण्यात, गाण्याचे शब्द हे त्याचे बलस्थान असते, तरीदेखील कवितेत किती प्रतिमा घ्याव्यात किंवा कुठल्या छंदात शब्दरचना करावी याबाबत काही संकेत आहेत. मुळात सगळा सुरांचा अविष्कार असल्याने रचनेत सुरांचे प्राबल्य अवश्यमेव. याचाच वेगळा अर्थ असा होतो, गाण्यातील शब्द हे अति गूढ, दुर्बोध असू नयेत. अर्थात असा काही नियम मांडणे कठीण आहे. गाण्यातील शब्द अर्थवाही असणे तसेच ओळीच्या सुरूवातीला आणि शेवटाला जे शब्द किंवा अक्षरे असतील, ते सुरांशी जवळीक साधणारे असतील तर ते गाणे गायला सहज सुंदर जाते. यशवंत देवांनी एके ठिकाणी सुंदर विधान केले होते - ''गाण्याची चाल कवितेतच दडलेली असते, आम्ही फक्त ती शोधून काढतो''. सूत्रबध्द विचार. इथे तर खुद्द संगीतकारच कवी असल्याने, शब्दतून काय मांडले आहे, याबाबत दुजाभाव संभवतच नाही. सुरुवातीलाच सतारीची सुंदर गत आहे. त्या सुरावटीत गाण्याची चाल दडलेली आहे. यमन रागावर आधारित चाल आहे हे सहज उमजून घेता येते. संगीतकाराला चाल बांधताना, शब्दातील आशय नेमका ओळखून, ओळीतील कुठल्या शब्दाला अधिक महत्व द्यायचे हे नेहमी ठरवावे लागते, ज्यायोगे कवितेतील आशय अधिक खोलवर ध्यानात येऊ शकतो. इथे बघू या.

**'जीवनात ही घडी अशीच राहू दे,**
**प्रीतीच्या फुलांवरी वसंत नाचू दे'**.

चाल ऐकताना, लगेच जाणवेल, 'जीवनात' हा शब्द स्वरांत मांडताना, 'जी' शब्दावर हलकासा जोर दिलेला आहे आणि त्यातून नेमका अर्थ ध्वनित केलेला आहे. संगीतकाराचा कवितेविषयीचा अभ्यास हा अशा प्रकारे समजून घेता येतो. तसेच गाणे एका उत्फुल्ल मनोवृत्तीचे असल्याने ह्याच ओळी परत घेताना, लय दुगणित घेऊन, चाल थोडी जलद घेतली असल्याने गाण्याची स्वरावली नेमकी मनात ठसते. चाल थोडी जलद घेतल्याने गाण्यातील भावविभोर वृत्ती खुलून आली. पहिला अंतरा देखील याच अंदाजाने बांधलेला आहे. ध्रुवपद जलद लयीत संपविल्यावर तीच लय कायम ठेऊन वाद्यमेळ रचना केली आहे. सतारीच्या जोडीने बासरी आणि व्हायोलीनचे सूर घेतले आहे. या इथे व्हायोलीनवर जे सूर घेतले आहेत, त्याची घडण थोडी यमन कल्याण रागाची आठवण करून देणारी आहे. हे व्हायोलीनचे सूर जरा ध्यानात ठेवणे जरूरीचे आहे कारण पुढील विवेचनात याच सुरांचे थोडे वेगळे संदर्भ आपल्याला बघता येतील.

इथे जे व्हायोलीनचे सूर आहेत, ते जरा बारकाईने ऐकले तर, अशीच सुरावट या 'चिमण्यांनो परत फिरा' आणि 'जीवन डोर तुम्ही संग बांधी' या गाण्यातील दुसऱ्या अंतऱ्यात घेतलेली आहे. भारतीय संगीताची ही खास गंमत आहे. वास्तविक, हे गाणे यमन रागावर आधारित आहे पण तरीही यमन कल्याण रागाचा संदर्भ इथे चपखल लागू पडतो. आता, ही तिन्ही गाणी संपूर्ण वेगळ्या धाटणीची आहेत. एकाचा दुसऱ्याशी काहीही संबंध नाही पण, स्वरांची भाषाच अशी आहे, तिथे अशी



जवळीक साधली जाते. या दोन रागांत प्रमुख फरक एकाच सुराचा आहे, एकात शुध्द मध्यम आहे तर दुसऱ्यात तीव्र मध्यम आहे. व्यासंग असा दिसतो की या स्वरांची जोड कशी संपूर्ण गाण्यात समावून घेतली जाते.

अंतऱ्यातील जलद लय, पहिले कडवे सुरू होताना परत मुखड्याच्या सुराशी येऊन थांबते आणि कडवे सुरू होते.

**'रंगविले मी मनात चित्र देखणे,**
**आवडते वेडीला ते स्वप्न खेळणे,**
**स्वप्नातील चांदवा जीवास लाभू दे,**
**जीवनात ही घडी अशीच राहू दे'....**

या ओळीतील चांदवा वास्तविक उर्दूतील 'चांद' शब्दाचे वेगळे स्वरूप आहे पण, रचनेचा मीटर लक्षात घेता, तिथे ३ अक्षरांचाच शब्द आवश्यक होता आणि तिथे मराठीतील चंद्र

शब्द बसवला असता तर गाण्याची लय थोडी बिघडली असती. मघाशी मी गाण्यातील शब्दांविषयी जे लिहिले ते याच संदर्भात तपासून घेणे योग्य आहे.

लताबाईंची गायकी किती श्रीमंत आहे, ते बघण्यासारखे आहे. पहिल्या ओळीतील 'देखणे' हा शब्द किंवा पुढील ओळीतील अंत्याक्षर 'दे' या शब्दावरील हलकी पण वजनदार फिरत ऐकण्यासारखी आहे. ही फिरत, सहज वाढवता येऊ शकेल पण, त्याने शब्दांच्या अर्थाचा बेरंग झाला असता आणि याच उद्देशाने ती हरकत इतकी थोडक्यात आटोपली आहे की, ऐकताना जीव कासावीस व्हावा. सुगम संगीतातील अलंकार हे असेच असतात.

**'हळूच तुला बघण्याचा छंद आगळा,**
**लज्जेचा त्यावीण का अर्थ वेगळा,**
**स्पर्शातून अंग अंग धुंद होऊ दे,**
**जीवनात ही घडी.........'**

या ओळीची सुरूवात हळूच या शब्दाने होते. नायकाकडे बघायचे आहे पण त्याला न जाणवून देता, असा मुग्ध शृंगार इथे अभिप्रेत आहे म्हणून याच अर्थाने 'हळूच' शब्द लताबाईंनी उच्चारला आहे. अशा खास अलंकारांनीच गाणे खुलत जाते आणि रसिकांच्या मनात उतरत जाते. 'लज्जेचा त्यावीण का अर्थ वेगळा' या ओळीचा पूर्वार्ध आधीच्या ओळीत असल्याने शब्दांचा आशय आणि त्याला दिलेली सुरांची जोड इतकी सुंदर आणि गोड आहे की परत, परत या स्वर वाक्यांशाचा आस्वाद घ्यावा.

**'मीलनात प्रेमगीत धुंद होऊ दे,**
**जीवनात ही घडी.......'**

हे अखेरचे कडवे म्हणजे एका धुंद क्षणाचा अविस्मरणीय समारोप आहे. वास्तविक, चाल तशीच आहे, त्यात काही वेगळया सुरांचा उपयोग नाही पण जर का मूळात चालच अति श्रवणीय असेल तर त्यात काही प्रयोग करण्याची फारशी गरज पडत नाही. त्याचा परिणाम असा होतो, गाण्याचा सुरूवातीचा परिणाम आपल्या मनात अधिक ठाम होत जातो.

आज इतकी वर्षे मी हे गाणे ऐकत आहे आणि प्रत्येक वेळेस हे गाणे अगदी नव्याने ऐकल्याप्रमाणे मनात झिरपत जाते.




**-अनिल गोविलकर**
9819931372
govilkaranil@gmail.com



# जगाच्या पाठीवर कुठेही जा, मात्र
# ट्रॅव्हल इन्शुरन्स पॉलिसी
## आमच्याकडूनच घ्या



- वय वर्षे ९९ पर्यंत वैद्यकीय चाचणीची आवश्यकता नाही.
- पॉलिसी ५०,००० डॉलर्सपासून ५ लाख डॉलर्सपर्यंत उपलब्ध.
- आम्ही कोणत्याही इन्शुरन्स कंपनीची पॉलिसी देतो.
- प्रिमियमचे दर अत्यंत माफक
- पॉलिसीची संपूर्ण माहिती, त्याची संपूर्ण सेवा त्वरित देण्याची व्यवस्था करतो.
- आपला काही क्लेम असेल तर आपल्याला संपूर्ण मार्गदर्शन करुन आपली नुकसानभरपाई मिळेपर्यंत सेवा.

**श्री. अनंत पु. गोखले**
भ्रमणध्वनी : 9869526152
दूरध्वनी : 26832233

इ-२/७०३, विजयनगर सोसायटी,
स्वामी नित्यानंद मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.
email: anant2611@yahoo.co.in

## ऊस डोंगा...


- सौ. शुभदा कुलकर्णी

मागे एकदा काय झालं, काही महत्वाच्या कारणामुळे कोल्हापूर ते मुंबई असा प्रवास आरक्षणाशिवाय करावा लागला. तोही रात्रीचा. महिलाचा डब्बा गच्च भरूनही गेला. त्यात लग्नाचा मोसम म्हणून बायका-मुले व त्यांचे ढीगभर सामान. आम्ही पांच-सहा सुशिक्षित व पांढरपेशा बायका सोडून डब्यात बाकी सर्वजणी जवळ-जवळ अशिक्षित व अडाणीच होत्या. डब्यातील गर्दीमुळे भांडणाला रंग चढला होता. दोन बाकांमधला येण्याजाण्याचा रस्ताही त्या बायकांनी व त्यांच्या गाठोडेवजा सामानाने पूर्णपणे व्यापला होता. त्यात दुर्गंधीची भर पडल्यामुळे श्वास कोंडून गुदमरल्यासारखे वाटत होते. गाडी सुटल्यावर बाहेरून येणाऱ्या वाऱ्याने जरा हायसे वाटले.

डब्याची सर्व दारे सुरक्षिततेसाठी बायकांनी घट्ट लावून घेतली होती व तेथेही पथाऱ्या टाकून, अंग मुडपून, लेकरांना कुशीत घेऊन त्या आडव्या झाल्या होत्या. एक दार मात्र अर्धवट उघडत होते. कोल्हापूरहून गाडी सुटल्यावर दोन तास सर्वत्र चिडीचूप होते.

मध्येच कोणत्यातरी आडगावच्या स्टेशनवर गाडी थांबली व घाईघाईत चारपाच वडारणी आपल्या मोठमोठ्या बोचक्यासह त्या अर्धवट दारातून कशाबशा आत घुसल्या. वाटेत झोपलेल्या लेकरा-बाळांच्या हातापायावर पाय देऊन त्या आत शिरल्या. त्यांच्या बरोबरच जाडाजुडा, काळा असा एक रांगडा पुरूषही एकेकीचे सामान पुढे सरकवत डब्यात आला. मग झोपलेल्यांचे चवताळून उठणे, छोट्यांचे रडणे, बायकांचे शिव्याशाप यांची पुनरावृत्ती झाली व गाडी हलली. बायकांच्या डब्यात तो आडदांड, दरोडेखोरासारखा पुरूष चढला म्हणून आम्ही सर्वजणीनींच हलकल्लोळ केला पण तो पुरूष काही उतरला नाही व त्याच्या बरोबरच्या बायकांनी त्याला उतरू दिले नाही. बायकांचा डब्बा, त्यात प्रत्येक बाईकडे थोडे जोखमीचे सामान, अंगावर चार दागिने म्हणून आम्ही सर्वजणी खूपच घाबरलो. हतबल होऊन आम्ही तिघी चौघींनी गाडी थांबविण्यासाठी साखळी ओढण्याचाही प्रयत्न केला. पण व्यर्थ. बायकांचा हा शेवटचा डब्बा. आरडा-ओरड करूनही काही उपयोग झाला नाही. आम्ही सर्वजणी खूपच घाबरलो. त्या वडारणीनी त्या आडदांड पुरूषाच्या मदतीने आम्ही सर्वांना लुटले असते व ती सर्वजण उतरून गेली असती, तरी आम्ही काही करू शकलो नसतो. अखेर माझ्यासारख्या बऱ्याचजणींनी गुपचूप अंगावरचे दागिने काढून कनवटीला लपवून ठेवले. आयांनी लेकरांना छातीशी धरले. सर्वच स्त्रियांची झोप उडाली होती. स्वसंरक्षणासाठी जो तो मनांत देवाचा धावा करीत होता.

सर्वांना बाजूला सारून त्या वडारणींनी व त्या धटिंगणानेच आपल्या ट्रंका व गाठोड्यानी तो पॅसेज व्यापला. डब्यातल्या कुणाचीच दखल न घेता व रात्रीची वेळ आहे, जरा हळू बोलावे





ह्याकडे दुर्लक्ष करून भसाड्या आवाजात गप्पा सुरू केल्या. भीतीबरोबर आता वैतागही आला होता. त्यांच्या कळकट कपड्याच्या व तंबाखूच्या वासाने मळमळल्यासारखे होत होते. पण नाईलाज होता. हळूहळू गप्पा थांबल्या व एकमेकांच्या खांद्यावर माना टाकून ते पेंगायलाही लागले. आम्ही बऱ्याच बायका मात्र टक्क जाग्या होतो. आपआपले सामान हातापायाशी घट्ट धरून, एकमेकींशी हळूहळू कुजबूजत बसलो होतो. आमची झोप मात्र पार उडाली होती

आणि अचानक गाडीचा वेग मंदावला व कोणतेही स्टेशन नसताना गाडी थांबली व बाहेरून प्रत्येक दारावर जोरजोरांत धक्के

## मागे एकदा

बसल्याचा आवाज आला. आता हा काय प्रकार चाललाय म्हणून परत छातीत धडधड सुरू झाली. तोपर्यंत खिडक्यांवरही जोरजोरात दगड येऊ लागले. घाबरून सर्वांनीच जोरात आरडा-ओरडा सुरू केला. त्या वडारी मंडळींजवळचे दार धडाधड आपटल्यामुळे उघडण्याच्या बेतात होते. पण तेवढ्यात त्या धटिंगणाने आपल्या महाकाय शरीराचा रेटा दारावर दिला. वडारणींनीही मल्लप्पा-मल्लप्पा करीत त्याला दारावर रेटा देण्यास मदत केली. हे सर्व सहन करीत गाडी थंडपणे उभी होती. डब्यात काचांचा खच होत होता. भीतीने थरथरत आम्ही सर्व प्रवासी कसेतरी उभे होते. तेवढ्यात मल्लप्पा धटींगण आपल्या पहाडी आवाजांत आम्हा सर्वांना ओरडून म्हणाला, ''ओ आयाबायांनो कोनी बी घाबरू नका. समद्यांचं जडजड सामान लोटा इकडं, म्हंजी दार खोलनार नाय. या भागातल्या जंगलाचे चोरलोक हमेशा डल्ला मारतात बायकांच्या डब्यावर. पन घाबरू नका, काय बी व्हनार नाय, म्या हाय ना तगडा गडी इथं ! ए भीमे, मंगे, त्या पेट्या सरकवा ना भराभर इकडं...''

त्या भारदस्त आवाजाने सर्वांनाच धीर आला. प्रत्येकीच्या अंगात बळ संचारले. मघाशी मल्लप्पा व वडारणीना भिऊन जपलेले जडजड सामान त्यांच्या हुकमानुसार त्या दाराजवळ सरकावले. मल्लप्पा एखाद्या भक्कम खांबाप्रमाणे दाराला पाठ लावून उभा होता व त्याच्याबरोबरच्या भीमा, यमना, मंगी त्याला मदत करीत होत्या. डब्याची दोन दारे पूर्णपणे लॉक होती व उघडण्याची शक्यताच नव्हती हे आमचे सुदैवच म्हणायचे. परंतु, त्या दारावरचे धक्केही अजून थांबले नव्हते. ह्या अर्धवट उघडणाऱ्या दाराजवळून मात्र पीळदार शरीराचा मल्लप्पा ताकदीने उभा होता. अजूनही गाडी ठप्प उभीच होती. बाहेर काय चालले आहे हे कुणालाच समजत नव्हते. महिलांचा हा शेवटचा डब्बा, तो सोडून गाडी पुढे गेली असती तर ! आपली खैर नाही या कुतर्कानि प्रत्येकाचे काळीज कुरतडत होते. डब्यातला गोंधळ जास्तच वाढला होता. पण आता डब्यातले चित्र पार पालटले होते. मल्लप्पाविषयीचा मनातला पूर्वग्रह बाजूला सारुन जी ती पदर खोचून त्याला मदत करीत होती आणि तो आम्हाला धीर देत होता. दोन तीन तासापूर्वी मल्लप्पाला खाली उतरायला सांगणाऱ्या, शिव्या देणाऱ्या आम्ही बायका केवळ आमच्या स्वरक्षणार्थ त्याच्या आज्ञा पाळीत होतो. तोच आता आमचा त्राता होता. ऐन कडाक्याच्या थंडीचे दिवस असूनही आम्ही सर्वजणी घामाघूम झालो होतो. हे नाट्य बराच वेळ चालले होते. अखेर देवाला मल्लपासह आमची सर्वांची दया आली व एकदाची गाडी हलली. दोन मिनिटातच गाडीने वेग घेतला. वादळ थांबले व आम्ही सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला.

आम्ही सर्वांनी संकटाला तोंड दिले खरे, पण खरा खिंडीत लढून गड जिंकला तो मल्लप्पाने व त्या वडारणीनींच. नंतरही डब्यातल्या काचा त्यानी आपल्याजवळील जुन्या फडक्यानी एका बाजूला सारल्या. अक्षरशः आम्ही मल्लप्पाचे व वडारणींचे पाय धरले. किती मोठ्या संकटातून वाचविले होते त्यांनी आम्हाला?

पहिल्यांदा लुटारू, दरोडेखोर वाटणारा मल्लप्पा आता आमचा देव व जवळचा मित्र बनला होता. आता त्याचे, त्या वडारणींचे रूप, कळकट मळकट कपडे, वास सर्व कांही विसरून आम्ही त्यांच्या रांगड्या भाषेतील गप्पात रमलो. लपवलेले दागिने हळूच काढून अंगावर चढवले. एका बाईने तर आपल्या पिशवीतले लाडू काढले व सर्वांना वाटून संकटातून सुटल्याचा आनंद सोहळा पार पाडला. गप्पाच्या नादात पहाट कधी झाली व कल्याण स्टेशन कधी आले ते समजलेच नाही.

पहिल्यांदा शत्रू वाटणारा मल्लप्पा आमचा मित्र व यमी-मंगी आमच्या मैत्रिणी झाल्या होत्या. 'उस डोंगा परि रस नोहे डोंगा'... हा तुकोबांचा अभंग मनांत रुतला. हृदयस्पर्शी ठरला.

ह्या अविस्मरणीय प्रवासातील प्रसंगाने माणसांच्या स्वभावाचे व माणुसकीचे घडलेले दर्शन मी कधीच विसरणार नाही.

**-सौ. शुभदा कुळकर्णी**
स. क्र. १०४२

## थोडे कोडे

**अशी माणसे ज्यांच्यापुढे कर जोडावेत.....**

१. एका दारूचा ब्रांड ज्याच्या नावाचा पण ज्याने उभ्या आयुष्यात दारू प्यायली नाही असा हिंदी चित्रपट सृष्टीतला अभिनेता
□□ □□□

२. माजी दिवंगत ऋषीतुल्य सरसंघचालक
□□□ □□□□□□

३. ग्रँड प्रिक्स, वेगाचे दुसरे नाव
□□□□ □□□□

४. शेजारच्या देशाचे नाव ज्याच्या नावात असा भारताला अभिमान असलेला क्रिकेटवीर □□□ □□□□□

५. ज्याच्या नावात काना मात्रा वेलांटी नाही असा दिवंगत मराठी विनोदी चित्र-नाट्य अभिनेता
□□□ □□□□□□

६. हळद या गुणकारी औषधीच्या पेटंटसाठी लढा देणारे भारतीय शास्त्रज्ञ
□□□□ □□□□□

७. तो मी नव्हेच म्हणत तोच मी नावाने आत्मचरित्र लिहिणारा मराठी लोकप्रिय नाट्य अभिनेता
□□□□ □□□□□

८. गायिका कैक झाल्या, अजूनही होतील पण हिचा गळा वेगळा
□□ □□□□□

९. ज्याने अनेक कादंबऱ्या लिहिल्या, जो वाचकप्रिय होता पण साहित्यिक म्हणून मान्यता नसलेला, त्याच्या 'दुनियादारी'ने मरणोत्तर त्याला प्रसिध्दी दिली असा लेखक
□□□ □□□□□□

१०. आपल्या अभिनयाच्या जोरावर रामा शेट्टी साकारून ज्याने हिंदी चित्रसृष्टीला खलनायक दिला, असा दिवंगत अस्सल मराठी अभिनेता
□□□□ □□□□□□□

उत्तरे - १ जॉनी वॉकर २ माधव गोळवलकर ३ मायकेल शूमाकर ४ सचिन तेंडुलकर ५ शरद तळवलकर ६ रघुनाथ माशेलकर ७ प्रभाकर पणशीकर ८ लता मंगेशकर ९ सुहास शिरवळकर १० सदाशिव अमरापूरकर

# नातीगोती

## आल्या परीक्षा परीक्षा

**-गणेश आचवल**

जानेवारीची गुलाबी थंडी ओसरू लागते आणि आता अनेक घरांमध्ये काऊंट डाऊन सुरू झालेले दिसते आणि ते म्हणजे परिक्षांचे. बारावीच्या परीक्षा या २१ फेब्रुवारी पासून तर शालांत परीक्षा या मार्चच्या पहिल्या आठवड्यात सुरू होत आहेत. खरे तर या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांपेक्षा पालकांचीच परीक्षा असते. दहावीची परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील पहिली मोठी महत्वाची परीक्षा. त्यामुळे पालक जास्त टेन्शनमध्ये असतात. नोकरी करणारी आई ही महिनाभर रजा घेण्याचे ठरवते. खरे तर सध्याच्या काळात मुलांना पालकांनी रजा घेतलेली नको असते. पण मित्रांनो, पालक रजा घेतात ते एका अर्थी बरोबर आहे कारण या काळात मुलांच्या आरोग्याकडे आणि खाण्यापिण्याच्या बाबतीत मुलांकडे लक्ष देणे जरूरीचे असते. गेले काही वर्ष एक नवीन ट्रेंड सुरू झाला आहे आणि तो म्हणजे दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या घरी जाणे. एरवी कधीही फारसे न भेटणारे नातेवाईक कर्तव्यपूर्ती म्हणून 'बेस्ट लक' द्यायला आवर्जून विद्यार्थ्यांच्या घरी येतात. बरं येतात ते येतात, पण खूप मोलाचे (?) मार्गदर्शनही करतात. या शुभेच्छा देणाऱ्यात शेजाऱ्यांचा तर कायम समावेश असतो. 'दादाला ८५% होते, तुला ९०% मिळायलाच हवेत' 'मग काय कुठे जाणार नंतर? कॉमर्स की सायन्स? सायन्सलाच जा, कॉमर्सला कोण विचारतंय?' 'सुट्टीमध्ये इंग्रजी पेपर वाच, तू मराठी माध्यमाचा आहेस, इंग्रजी काळाची गरज आहे आणि परीक्षेनंतर त्याकडे लक्ष दे.' अशा अनेक सूचना विद्यार्थ्यांना आधीच दिल्या जात असतात.

एखादा विद्यार्थी दहा मिनिटे जरी कोणाशी गप्पा मारताना किंवा थोडे खेळताना किंवा टीव्ही पाहताना दिसला, तर शेजारचे म्हणतात, 'अरे टीव्ही काय पाहतोस? दहावीची परीक्षा ना, एक एक क्षण महत्वाचा आहे, वाया घालवू नकोस. गप्पा काय कधीही मारता येतील, पण गेलेला वेळ काही परत येत नाही हो'. या सगळ्याचा त्या मुलांवर काय परिणाम होतो, कोणी विचारच करत नाही. बेस्ट लक द्यायला जाताना मनापासून किती जण जातात आणि कर्तव्यपूर्तीसाठी किती, हा एक वेगळा प्रश्न आहे. असो, काळाचा महिमा. एक मात्र खरे की शालांत परीक्षा आणि बारावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्वाचा टप्पा असतो. सध्या अनेक विद्यार्थी थोडे बिनधास्त पण झालेले असतात आणि या बिनधास्त होण्याच्या नादात कसे गोंधळ होतात याचे हे एक दोन किस्से.

काही वर्षापूर्वीची गोष्ट. शाळेमधून सर्व विद्यार्थ्यांना हॉलतिकीट अर्थात प्रवेश पत्रिका मिळाली. एका विद्यार्थिनीने ती क्लासमध्ये नेली आणि नंतर तिला काही ते हॉलतिकीट मिळेना. कोणीतरी हे पळवलेच असेल असे म्हणून तिची काही जणांशी भांडणं पण झाली. परीक्षेच्या पहिल्या दिवशी शाळेच्या प्राचार्यांचे पत्र घेऊन त्या मुलीचे पालक सेंटरवर गेले. पहिल्या दिवशी त्या मुलीला परवानगी मिळाली. डुप्लिकेट हॉल तिकीटासाठी नियमानुसार वाशी येथे बोर्डाच्या ऑफिसमध्ये जावे लागणार होते. मगाशी म्हटल्याप्रमाणे पालकांचीच ही एक परीक्षा ठरली. बोर्डाच्या ऑफिसमधून दुसरे प्रवेशपत्र तिला मिळाले आणि मग दोन तीन पेपर झाल्यावर बीजगणिताच्या पुस्तकात तिचे मूळ प्रवेशपत्र तिला सापडले.


वाचकहो, एक सांगावेसे वाटते की पालकांनीच प्रवेशपत्रिका मिळाली की लगेच तिची झेरॉक्स काढून ठेवावी आणि मूळ प्रत नीट ठेवावी.

काही शाळांच्या नावामध्ये पण साम्य असते. म्हणजे असे की महानगरपालिका शाळा क्रमांक तीन आणि चार, सेंट तेरेसा हायस्कूल. आपल्या पाल्याला कोणते केंद्र आले आहे हे तिथे प्रत्यक्ष जाऊन पहावे. कारण एकदा असे झाले होते की एका मुलाला जी टी हायस्कूल हे क्रेंद्र आले होते आणि त्याच्या मित्रांना डी जी टी हायस्कूल. ज्या मुलाला जी टी हायस्कूल केंद्र आले होते, तो मित्रांबरोबर डी जी टी हायस्कूलला गेला आणि तिथे त्याचा नंबरच नव्हता. मग खूप गोंधळ झाला, तो त्याच्या केंद्रावर उशिरा पोचला, त्याचा पेपर अपूर्ण राहिला वगैरे वगैरे. म्हणून या संदर्भात आदल्या दिवशी त्या परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष जाऊन पहा की इथे आपला नंबर आहे ना?




या परीक्षा मोसमात अजून एक चर्चा असते आणि हल्ली फेसबुक आणि Whatsupच्या जगात तर अमक्या क्लासने हे प्रश्न महत्वाचे दिलेत, या वर्षी या प्रश्नातीलच येणार आहे. 'आमच्या मित्राला पेपर कळतात' अशा अनेक बातम्या धडाधड फॉरवर्ड होतात आणि मग त्यातून विद्यार्थ्यांची दिशाभूल होऊ शकते. बारावीचे विद्यार्थी तर परीक्षेच्या मोसमात खूप जागरण करताना आणि अगदी पूर्ण रात्र जागताना पण दिसतात. मित्रांनो, त्याने पुरेशी झोप होत नाही आणि पेपर लिहिताना डोके दुखणे, चक्कर येणे असे होऊ शकते. अनेकजण पेपर लिहिताना ते प्रवेशपत्र डेस्कच्या खणात ठेवतात आणि मग ते हॉलतिकीट तिथेच विसरले गेले, असे प्रकार सुध्दा घडल्याचे ऐकू येते.

परिक्षांचा मोसम सुरू होतोय म्हणून विद्यार्थी, पालक आणि समाज यांच्या नात्याविषयी आज लिहावेसे वाटले. सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा. यशस्वी भव!



**-गणेश आचवल**
9833268391
athatharvbharadwaj@gmail.com

# व्हॅ‘नीला’

## दारावरचे पाहुणे

**नीला वैशंपायन**

मुंबईचं सिंगापूर आणि नंतर शांघाई होत असतानाच्या गेल्या दहा वर्षात मुंबईने खरोखरच कात टाकली. दक्षिण आणि मध्य मुंबईतल्या अनेक चाळी पडल्या आणि टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या. तळ मजल्यावरची माणसं ७व्या ८व्या मजल्यावर रहायला गेली आणि छोट्या छोट्या गोष्टींसाठी आता कोण आलं गेलं काही कळत नाही असं होऊ लागलं. किती वेगवेगळे माणसं दारात येत असत.


आमच्या गिरगावात सकाळ फार लवकर होत असे, पाणी सकाळी ५ वाजता येत असे, म्हणजे तसं वाहत वाहत घरी पोचे पर्यंत ५.३० वाजत आणि पुन्हा लवकर घरी पोचायची घाई असलेल्या लेकुर्वाळीप्रमाणे ७च्या ऐवजी ६.३०लाच परतीची वाट पकडे. लवकर उठून आंघोळी उरकून सातपर्यंत सगळं आटोपलं की, दारात गरम गरम पेपर पडलेलाच असायचा. पेपर हातात घ्यायचा तर सायकलची बेल ऐकू येई. चाळीत आलटून पालटून २/३ जण तरी निघत जे सकाळी अगदी गरम गरम पाव घेत असत. पाव इतका गरम असे की, जीना चढून घरी पोचेपर्यंत दोनदा हात बदलावा लागे. त्याच वेळेला चिपळ्या वाजवत स्वत:भवती गिरक्या घेत वासुदेव येई. तसा लुंगी नेसून छत्री उलटी ठेवून त्यात पैसे गोळा करणारा मुसलमान फकीरही येत असे.


गिरगावात चाळीत नळाची जागा सामाईक असायची. तिथे गडी माणसं कपडे धूत असत. भांडी धुण्यासाठी त्यांची भलीमोठी पत्र्याची पिंप कोण भरून ठेवत असे ते भरणाऱ्यालाच ठाऊक. बहुधा चाळीत एखादं अख्खं कुटुंब काम करत असे. कपडे धुऊन झाले की, छान झटकून, निऱ्या काढून, बादलीत ठेऊन १०च्या आधी घरात जायचं. प्रत्येक कपड्याला त्याच्या ठरलेल्या जागी दांडीवर लटकवून अक्षरश: ३/४ मिनिटांच्या आत ते बाहेर असत. ९-९.३० पर्यंत घरातल्या बायका स्वैपाकपाणी करून मोकळ्या होत असत. त्याच सुमारास एक मोन्या येत असे. अनवाणी पाय, स्वच्छ धोतर, पांढराच अंगरखा, शिडशिडीत देहयष्टी, गरगर फिरणारे तीक्ष्ण डोळे आणि यावर कळस म्हणजे आ पा प प पा असं म्हणताना, येणार त्याचा आवाज, नुसता ऐकला तरी लहान पोर पार आतल्या खोलीत धूम ठोकत.


पुरूष मंडळी बाहेर पडली की आलटून पालटून अनेक जण चाळी खालून जात. कधी ढकल गाडी घेऊन गोळेवाला यायचा तेव्हा हा गोळा १०पैशाला मिळत असे. आताही गोळा मिळतो पण आता आपल्याला त्याच्यापर्यंत जावं लागत. गोळ्याप्रमाणे पूर्वी आईसफ्रूट मिळत असे. एक चौकोनी पेटारा ढकलण्याच्या दांडीला एक घंटी. मध्यंतरी एका प्रसिध्द आईसक्रीम विकणाऱ्या कंपनीची अशी गाडी काही दिवस दिसली होती. ११च्या सुमारास ‘काळी काळी मैना, डोंगरची मैना’


















असा आवाज येत असे. कुडाच्या पानाचा द्रोण करून त्यात ही काळी करवंद देत. कोंबडा की कोंबडी? म्हणजे लाल की पांढरा असं करत खायचं. पांढरं करवंद इतकं आंबट निघे की एक डोळा हमखास बारीक व्हायचा.

दुपार वर आली की बोहारणी येत असत. जुने कपडे देऊन त्या जागी स्टीलचे डबे किंवा कधी काचेच्या कपबशा, बाऊल्स या अशा वस्तू मिळवल्या जायच्या. क्वचित प्रसंगी कोणी खास पाहुणे आले तर ही ‘क्रोकरी’ बाहेर येत असे.

काळवेळाचं बंधन न पाळता येणारेही अनेक जण होते. फुगेवाला, नंदीबैल, खेळणीवाली, तिच्याकडे धनुष्यबाण तयार मिळत असे, तसं तर अनेक वेळा तो घरी हिरकूटाच्या केरसुणीचा देखील बनवता यायचा. तिच्या हातात एक एकतारीसारखे वाद्य असे आणि पाठीमागे तडतड आवाज करणारी छोटीशी गाडी (दो आंखे बारह हाथ मधली संध्या आठवते नं?) कधी खरखर आवाज करत म्हातारीची कापूस काढून देणारा येत असे. माकड, अस्वलांचा खेळ करून दाखवणारे यायचे. तसे डोंबारी येत, बांबूच्या दोन टोकांवर दोर लावून त्यावरून लीलया चालत जाणारी डोंबाऱ्याची पोरं आठवली की, ऑलिम्पिकमध्ये आपल्याला सुवर्ण पदके का मिळू शकत नाहीत याची खंत वाटते. विशेष म्हणजे ही डोंबाऱ्याची पोरं चक्क २-३ तुकड्याच नववारी नेसलेली असे. याच खेळात लहान बाळाला बांबूला घट्ट बांधून उंच नाचवलं जायचं. ते पाहून पोटात धस्स व्हायचं. काळानुरूप शिक्षणाने म्हणा किंवा कशाने, ह्यात बदल झाला. हे असे अघोरी खेळ बंद झाले. करमणुकीची इतर साधने वाढली. जग छोटे करणारा संगणक आला, इंटरनेट आले आणि मुलं बंद दाराच्या आत गेली.

लहान मुलांची करमणूक करणारे हे एकीकडे, तर गृहपयोगी वस्तूंची देखभाल करणारे, घराच्या मंडळींच्या जिव्हाळ्याचे होते. चाकू सुऱ्यांना धार काढून देणारे धारवाले आता जुन्या सिनेमातच बघायला मिळतील. नवीन वेगवेगळ्या प्रकारांची वापरायला, साफ करायला सोपी अशी भांडी बाजारात आली आणि पितळेची भांडी डोक्यावर घेऊन कल्हई

असं ओरडत जाणारे अदृष्य झाले, कल्हईचा धंदा बसला. कापूस पिंजून देणारे पिंजारी तारेचा टणत्कार करत बोळांमधून फिरत तेही दिसेनासे झाले. पाटया वरवंट्याची जागा मिक्सरने घेतल्यावर पाट्याला टाकी करून देणारे टाकीवाले नाहीसे झाले. काळाच्या ओघात अनेक अनेक व्यवसाय लुप्त झाले हेच खरं.

दिवसाच्या वेळापत्रकात वाराप्रमाणे बदलणारे हे सगळे तर ऋतुचा बदल, साथीचे आजार येत त्यावेळी महानगरपालिकेचे कर्मचारी गल्लीतल्या एखाद्या इमारतीखाली बसून लहान मुलांना लस टोचून देत. आता साथीचे आजार लुप्त झाले. फक्त पोलिओचे डोस असे सार्वत्रिक दिले जातात. संध्याकाळ झाली की घरोघरी दिवेलागण व्हायची आणि शुंभंकरोति पाढे ऐकू येत. माझ्यासाठी आमच्या दरवाज्याच्या वरच्या गजांना दोरखंड बांधून झोपाळा तयार केला होता, त्यावर मऊ चादर टाकायची आणि झोपाळ्याच्या आमिषावर पाढे, रामरक्षा, गीतेचा अध्याय, सगळं म्हणून होत असे.

जेवण उरकताना थोडीशी भाजी उरणार असेल तर ती मागच्या दाराने शेजारी जात असे किंवा एखादे वेळी भाजीची exchange offer होत असे. चवीत बदल होऊन अन्न वाया जाणार नाही हे पाहिलं जाई. शनिवार, रविवार रात्र विशेष असे. लाल कापड गुंडाळलेल्या टोपलीतून कुल्फी विकायला कुल्फीवाला येत असे. त्रिकोणी कुल्फी चमच्याच्या टोकाने कापून पानावर खायची. गल्लीतला कुत्रा, मांजराचाही त्यावर हक्क असे. आमच्या गल्लीतल्या 'जाडया' कुत्र्यासाठी वेगळी कुल्फी घ्यावी लागे आणि मोठी दादामंडळी त्याचे हे लाड प्रेमाने करत असत. तो जवळपास नसला तरी येईल घेऊन ठेव, नंतर खाऊ देणार नाही म्हणून त्याच्यासाठी वेगळी ठेवली जायची. अंथरूण घालून दिवे घालवून रात्री १० वाजता रेडियोवर आपली आवड ऐकत आडवं व्हावं तर कुठूनतरी धडधड आवाज येई आणि ''चोर चोर'' असं ओरडत माणसांचा घोळका धावे. त्याबरोबर सगळी दारं फटाफट उघडून लोकं बाहेर येत. कुणी लुंगी सावरत, कुणी बनिअन वर तर कुणी चक्क उघडेच चोर पकडायला धावत. चोराने चोरी काय केलेली असायची तर दारात वाळत घातलेले कपडे, किंवा चपला, बुट. असे भुरटे चोर येत तेव्हा अख्खी चाळ एकत्र येई आणि त्याच निमित्ताने अनेक भांडणांना देखील पूर्णविराम मिळे.

आता चाळी पडल्या आणि मोठे कॉम्प्लेक्स उभे राहिले. वर्दीतल्या पहारेकऱ्याने फाटकापाशी ठिय्या दिला आणि हे सगळे फेरीवाले स्टेशनच्या वाटेवर ठिय्या देऊन बसले. इमारतींची उंची वाढली तेव्हढंच त्यांच्यातलं आणि आपल्यातलं अंतरही वाढलं.

(हा लेख लोकसत्तेच्या चतुरंग पुरवणीत साधारण २००६, १४ एप्रिल रोजी छापून आला होता)



**-नीला वैशंपायन**
9920329214
wneela2gmail.com

## आवाहन

श्री समर्थ रामदासस्वामींच्या हस्ताक्षरातील साधारण ४०० वर्षापूर्वीच्या संस्कृत रामायणाचे मराठी व इंग्रजी भावानुवादासह प्रकाशन करायचे आहे. या प्रकल्पाला शासकीय अनुदान नाही. केवळ लोकाश्रयावरच श्री रामदासस्वामी व श्री गोंदवलेकर महाराजांच्या कृपेने हा प्रकल्प पूर्णत्वास जाण्यासाठी आपला सहभाग अपेक्षित आहे. चैतन्य कलाघर निर्मित हृषिकेश मुखर्जींच्या चित्रपट कारकीर्दीचा संगीतमय मागोवा घेणारा **'हृषिदा'** हा कार्यक्रम दि. ३ मार्च रोजी रात्रौ ८ वाजता दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात आयोजित केला आहे.

कलाकार -डॉ.मृदुला दाढे-जोशी, विश्वास काळे, चिंतामणी सोहनी , संगीत संयोजक-आनंद सहस्त्रबुद्धे , संकल्पना - हेमंत विद्वांस संहिता-अनिल हर्डीकर, हेमंत विद्वांस

तिकिट दर रु. ५००, ४००, ३००, २००, १००

(काही रांगा निमंत्रितांसाठी राखीव)



तिकिटांसाठी संपर्क (सायं. ४ नंतर)

**हेमंत विद्वांस - 9619702033**

आ.स.क्र.२९०५



# कथा

## बुमण्णा मार्ग

-डॉ. अशोक कोर्डे

हल्ली मुम्बै महानगरपालिकेला घाऊक पध्दतीने रस्ते दुरुस्तीचा छंद लागलाय. त्यांच्या मते हे दुरुस्तीचे काम अत्यंत वेगाने चालू आहे! आमच्या भागात तर खडी, रेती, सिमेंट, डांबर, अक्राळ-विक्राळ मशिनं आणि हजारो टन धूळ. त्याने धूळवड आत्ताच साजरी होतेय. आम्ही पामर नागरिक ह्या परिस्थितीत आमचा जीवन मार्ग चाचपडत आहोत.

माझ्या हॉस्पिटलच्या समोरचा मार्ग असाच भग्नावस्थेत आहे. दोन मजूर ईमाने-इतबारे वेळेवर येतात, खड्डे खणतात, माती उचलतात, झाडे उपटतात, खडी टाकतात. एवढं मात्र खरं कामाला ते आपला धर्म मानतात. कामचुकारपणा नसतो, गप्पा-चकाट्या नाहीत, आरामात पडणं नाही. आपलं काम बरं की आपण बरे ह्या पठडीतले आहेत. सकाळी साडेआठला येतात, खाण्याचं पुडकं झाडावर अडकवतात, आपला कामाचा ड्रेस घालतात म्हंजे लुंगी सोडतात अन् हाफ चड्डी घातली की काम सुरू. उघडे, काळे, काटक अशी त्यांची बुटकीच मूर्ती आहे. माझी आणि त्यांची कामाची वेळ एकच आहे. त्यांचा अन् माझा लंच टाईम पण एकच आहे. आणलेलं जेवण दवाखान्याच्या पायऱ्यांवर बसून जेवतात. मी दिलेली पाण्याची बाटली घेतात. पायऱ्यांवर गुलमोहराची सावली येते, त्या खाली ते पहुडतात अन् मी घरात वामकुक्षी करतो!!

एकदा असाच घरात पहुडलो असताना हॉस्पिटलमध्ये सिस्टरने बोलावले, 'कोणाच्यातरी पायाला लागलय' म्हणून. बघतो तर त्या दोघांपैकी तोच एक पाय धरून ओरडत होता. रक्तबंबाळ अवस्था अन् वेदनेने विव्हळत होता. मग पाय स्वच्छ करणे, टाके घालणे, ड्रेसिंग, औषधं वगैरे उपचार पार पडले. खड्डा खणताना पहारीचा नेम पायावर बसला, अन् पायाला गंभीर दुखापत झाली. बाहेर पडताना त्याला 'पायको टाका डाला है, चार-पाच दिन गुपचूप पडे रहेने का, नाही तो पाव पक जायगा, हत्तीपाव के माफक' असे त्याला उच्च राष्ट्रभाषेत समजवून सांगितले. त्याने समजलं असे हावभाव पण दाखवले नाहीत. फक्त जाताना 'पैसा देगा' म्हणत तो गेला.

त्याच्या फॉर्मवर त्याचे नाव पाहिले, 'बुमण्णा' एवढेच लिहिले होते. तो होता तेलगू. सोलापूर-आंध्रच्या सीमेवर राहणारा. पण आता मुक्काम पोस्ट मुम्बै. मराठी-तेलगू-हिंदी ह्या त्रिसूत्री भाषा नियमाने तो बोलायचा. 'उद्या काय खाणार?' ही विवंचना असल्याने तो नियमाने साडेआठला पहार-फावडं घेऊन कामावर हजर झाला. जखम पायाला झाली होती. हाताला नव्हती!

तीन चार दिवसानंतर दुपारी दोन-तीनच्या दरम्यान एक घटना घडली. रस्त्यावरून एका माणसाचा जोरजोरात ओरडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. गॅलरीतून पाहतो तर तो बुमण्णा बावरून उभा होता. झाडामुळे मला ओरडणाऱ्याचा आवाजच फक्त ऐकू येत होता. म्हणून मी बुमण्णाला विचारले, 'क्यू रे, क्या हुआ?' तो म्हणाला 'वो गुस्सा करताय...मारने को आया है.' मी लगबगीने खाली गेलो. तर एका हिरव्या बुलेटवर बसलेला, पांढरे कपडे घातलेला, डोळ्यावर गॉगल चढवलेला मध्यमवयीन तरुण बुमण्णावर डाफरत होता, न् बुमण्णा कापत होता. मी श्वेतांबऱ्याला 'काय झालं' म्हणून विचारलं, तशी बाईकवरून उतरून माझ्याजवळ आला व मला म्हणाला 'एवढी ह्या रस्त्यावर वाढलेली झाडं होती. रस्ता दुरुस्ती, रुंदीकरणच्या नावाखाली हे हरामखोर तोडून टाकतात ही झाडं, पार उजाड केलाय रस्ता, तो साला कॉन्ट्रॅक्टर कधी भेटतच नाही, म्हणून ह्याला झापतोय.' माझ्यापण लक्षात आलं. मी बुमण्णाला विचारलं 'किधर है रे तुम्हारा मुकादम?' त्याने 'क्या मालूम' म्हणून चेहरा केला. तरी तो मला व त्या ओरडणाऱ्याला बोलावून त्या खाचखळग्यातून रस्त्याच्या कडेने जिथे झाडे तोडली होती तेथे घेऊन जाऊ लागला.

जिथं -जिथं झाड तोडलं होतं, त्याच्या मागे पुढे खड्डा खणलेला होता. त्यात तोडलेल्या झाडाची फांदी रोवलेली होती. प्रत्येक खड्ड्यातली माती ओली होती. त्या रोपांनी पाळं-मुळं धरलेली दिसत होती. बुमण्णा आम्हाला म्हणाला 'मी पौधा लगाया, झाडा काटा, पाप किया, फिर झाड लगाया.' मी तेथे पाहिले तर फूटपाथवर बऱ्याच ठिकाणी ओल्या मातीत रोपं वाऱ्यावर डुलत होती. मी मागे वळून पाह्यलं तर.....तर तो मिस्टर चमको बाईकवरून निघाला होता. बघ्या लोकांची 'काहीच तमाशा नाही' म्हणून निराशा झाली.



बुमण्णा जेथे राह्यचा तो भाग वैराण, दुष्काळी, झाडंच काय झुडूपं पण नाहीत. म्हणून त्यांची जमात झाडालाच देव मानते. ज्यांच्याकडून झाड चुकून जरी तोडलं गेलं तरी त्या हत्येचं, अपकृत्याचं पापपरिमार्जन म्हणून त्या व्यक्तीला नवीन रोप लावावंच लागतं. त्या बुमण्णानी किती झाडे तोडली, ती त्या रोपांच्या मोजदादीतून मला कळली. पण त्याला आता पाप लागणार नव्हतं.

माझ्याकडून जेवणासाठी म्हणून दोन मोठ्या पाण्याच्या बाटल्यांचा हिशोब मला आत्ता कळला. एक बाटली स्वत:साठी तर दुसरी त्याच्या पापक्षालनासाठी.

ह्या अशा वृक्षतोडणी पापात आम्ही किती वाटेकरी आहोत ह्याची कल्पनाच करवत नाही. आमचा वाल्मिकी होण्यासाठी बुमण्णा सारखाच गुरू पाहिजे.



**डॉ. अशोक कोर्डे**
**9820435204**







गणपती
अथर्वशीर्ष
आवर्तने





1
श्री. संतोष वैद्य व मृदुला दाढे-जोशी
संक्रमण महोत्सवाचे उद्‌घाटन करताना
2
मृदुला दाढे-जोशी यांची मुलाखत घेताना
मृदुला लेले






# संक्रमण महोत्सव - क्षणचित्रे



रेणू दांडेकर, राजा दांडेकर



सोनाली पाटणकर



रेणू गावस्कर




डॉ. हीरल शाह



संयुक्त कार्यवाह नीरजा करंदीकर



कॉर्पोरेट ट्रेनर सुब्रमण्यम् एस्. व्ही.



सौ. कल्पना साठे
संक्रमण महोत्सवात श्रोत्यांचे स्वागत करताना



प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण

हे मासिक सौ. कल्पना साठे यांनी ब्राह्मण सेवा मंडळ यांचेसाठी नवलाई प्रिंट हाऊस प्रा. लि. पाईपलाईन, अंधेरी पूर्व येथे छापून ब्राह्मण सेवा मंडळ, भवानीशंकर रोड, दादर येथे प्रसिद्ध केले.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संचालक व संपादक सहमत असतीलच असे नाही.